PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

दैनिक सत्यप्रभा
बातम्यांसोबत विचार देणारे

### विंडीजविरुद्ध आज पहिला वनडे

*मुंबई : भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला वनडे रविवारी (२७ सप्टेंबर) होत आहे. या सामन्यात कर्णधार शुभमन गिल दुखापतीमुळे बाहेर राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गिलच्या गैरहजेरीत यशस्वी जयस्वाल, ऋतुराज गायकवाड, ध्रुव जुरेल आणि नमन धीर हे पर्याय आहेत. तर उपकर्णधार केएल राहुल संघाची धुरा सांभाळेल. बुमराहच्या गैरहजेरीत वेगवान गोलंदाजीची धुरा मोहम्मद सिराजच्या खांद्यावर असेल.*

### कबड्डीत भारताचा गोल्डन डे!

*आयची-नागोया (जपान) : आशियाई क्रीडा स्पर्धेत शनिवारी भारताच्या पुरुष आणि महिला कबड्डी संघांनी शानदार कामगिरी दुहेरी सुवर्णपदकावर नाव कोरले. विशेष म्हणजे दोन्ही सामन्यात भारतीय संघांनी इराणविरुद्धच विजय मिळवला. पुरुष गटात इराणचा ४०-३४ असा पराभव करत आशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले.*

(सविस्तर वृत्त पान दोनवर)

## संक्षिप्त

### एटीएम व्यवहार तीन दिवस पूर्णपणे मोफत

**नवी दिल्ली :** बँक कर्मचारी संपाच्या पार्श्वभूमीवर एसबीआय, पंजाब, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँकेने २८ ते ३० सप्टेंबरपर्यंत सर्व एटीएम व्यवहार शुल्क पूर्णपणे माफ करण्याची घोषणा केली आहे. बँकांच्या या निर्णयामुळे मासिक मोफत मर्यादा संपल्यानंतरही, ग्राहक देशातील कोणत्याही बँकेच्या एटीएममधून कोणत्याही शुल्काशिवाय रोख रक्कम काढू शकतील.

### नजरकैदेत ठेवल्याचा ममता बॅनर्जींचा आरोप

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील श्रीरामपूर कोर्ट ग्राऊंडवर होणाऱ्या सभेच्या पार्श्वभूमीवर, माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपल्याला घरातच नजरकैदेत ठेवण्यात आले असून तृणमूलच्या सभेला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जात नाही, असा आरोप केला आहे. तर सभेला जात असलेल्या टीएमसी आ. कुणाल घोष यांच्या गाडीवर अंडी आणि दगडफेक करण्यात आली.

### दान चोरीप्रकरणी आरोपपत्र दाखल

**अयोध्या :** राम मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणी एसआयटीने तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात अटक केलेल्या आठ आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले असून श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टशी संबंधित असलेले चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांना तपासात निर्दोष ठरवण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात एकूण १३३ साक्षीदारांची नावे आहेत.

### डीजेच्या आवाजामुळे विद्यार्थीनीचा मृत्यू

**भोपाळ :** डीजेच्या ध्वनी प्रदुषणावरुन चर्चा असताना डिजेच्या आवाजाने एका मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या पालकांनी केला आहे. मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यात ही धक्कादायक घटना घडली आहे. जे. एच. कॉलेजच्या गणेश विसर्जनाच्या मिरवणूकीत १७ वर्षांची विद्यार्थीनी प्रतीक्षा वर्माची प्रकृती शुक्रवारी रात्री अचानक बिघडली आणि ती बेशुद्ध झाली. प्रतीक्षाला रुग्णालयात दाखल केले. परंतु, तिला मृत घोषीत केले.

## शासन निर्णय जारी; महसूल सवलतींसह शेतकऱ्यांना विविध १२ उपाययोजनांचा लाभ!

# राज्यात २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर!

वृत्तसंस्था। **मुंबई**

राज्यातील टीगर-१लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा शासन निर्णय राज्य सरकारच्या मदत व पुनर्वसन विभागाने जारी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन जाहीर केलेल्या घोषणेनुसार, हा शासन निर्णय जारी करण्यात आला असून या निर्णयानुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना आणि सवलती लागू करण्यात येणार आहेत.

दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी असून त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यानिमित्ताने व्यक्त केला आहे. राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक पान २ वर

### विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी; कृषीपंपांच्या चालू वीजबिलातही सवलत!, रोहयाच्या कामात शिथिलता




#### सहा विभागांतील तालुके

'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये राज्यातील विविध महसूल विभागांतील तालुक्यांचा समावेश आहे. ठाणे महसूल विभागातील १२, नाशिक विभागातील ४९, पुणे विभागातील ३५, मराठवाड्यातील ७४, अमरावती विभागातील ५६ आणि नागपूर विभागातील ३९ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे. नाशिक, धुळे, जळगाव, पान २ वर

#### दुष्काळग्रस्त भागात १२ सवलती लागू

● जमीन महसुलात सूट ● पीक कर्जाचे पुनर्गठन ● शेतीशी निगडीत कर्ज वसुलीस स्थगिती ● कृषीपंपांच्या चालू वीजबिलात सूट ● शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षाशुल्क माफ ● रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता ● आवश्यक तेथे टँकरने पाणीपुरवठा ● शेती पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे ● शेतीवर आश्रित शेतकरी, मजूरांना अन्नधान्य मदत ● जनावरांना चारा उपलब्ध करणे ● जलसंधारणाची कामे सुरू करणे ● पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन

### दुष्काळावर मात करण्यासाठी एकजूटीने प्रयत्न : मुख्यमंत्री
### नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा यादीमध्ये समावेश

## मुदखेड व मुखेडचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करा!

### खा. अशोकराव चव्हाण यांची मागणी; मुख्यमंत्र्यांशी चर्चा

प्रतिनिधी। **नांदेड**

राज्यात यंदा खरीप हंगामात पावसाने मोठी ओढ दिल्याने शासनाने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १६ पैकी १४ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. ट्रिगर-१ लागू न झाल्याच्या तांत्रिक कारणास्तव मुदखेड आणि मुखेड या दोन तालुक्यांचा या यादीत समावेश होऊ शकला नाही. परंतु, पिकांची प्रत्यक्ष परिस्थिती व शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता या दोन तालुक्यांचाही



दुष्काळी यादीत समावेश करावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र पाठवले असून, त्यांच्याशी दूरध्वनीवरूनही चर्चा केली आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात खा. अशोकराव चव्हाण यांनी निदर्शनास आणून दिले आहे, की मुदखेड तालुक्यात सरासरीच्या ८५ टक्के तर मुखेडमध्ये ८१ टक्के पावसाची नोंद असली, तरी एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने ही आकडेवारी वाढलेली आहे. प्रत्यक्षात पावसाचे वितरण अत्यंत असमान राहिले आहे. शिवाय, पिकांच्या वाढीसाठी सर्वात निर्णायक असलेल्या ऑगस्ट महिन्यातच पावसाचा मोठा खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. पिकांच्या नुकसानीची आकडेवारी मांडताना खा. चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे, की उपलब्ध माहितीनुसार मुदखेड तालुक्यात पेरणी झालेल्या २१ हजार ६७१ हेक्टरपैकी १३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्रावरील पिके वाया गेली आहेत. तर मुखेड तालुक्यात पेरणी झालेल्या ७५ हजार ८८८ हेक्टरपैकी तब्बल ६१ हजार ६०० हेक्टरवरील पिकांना पान २ वर

### सुनेत्रा पवार यांनी साधला सोनखेड, लोह्यात शेतकऱ्यांशी संवाद

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

प्रतिनिधी। **लोहा**



पावसाचा खंड पडल्यामुळे राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, शासनाने या परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. पंचनामे व पाहणीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल. शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज लोहा तालुक्यातील सोनखेड व लोहा येथे पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. विक्रम काळे, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. आनंद तिडके-बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पावसाअभावी शेतीतील पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मी मराठवाड्याचीच लेक असून, मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती चांगल्या प्रकारे जाणते. शेतकऱ्यांच्या भावनांची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. प्रशासनाला प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे ज्या प्रकारे नुकसान झाले आहे, त्यांना त्यानुसार मदत देण्यात येईल. सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कुटुंबांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पिण्याचे पाणी, चारा तसेच मुलांच्या शिक्षणासाठी शासन आवश्यक मदत करणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, लवकरच नुकसानग्रस्त पान २ वर

### ना. बावनकुळे, सावे करणार पाहणी

प्रतिनिधी। **नांदेड**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे सोमवारी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर कंधार तालुक्यातील शिराढोण येथे आयोजित महाआरोग्य शिबिरास उपस्थित राहणार आहेत. ना. बावनकुळे दुपारी पान २ वर

## चर्चेत राहण्यासाठी टीका; पप्पू पुन्हा फेल!

### मुदखेड-मुखेडच्या समावेशासाठी खा. चव्हाण यांची सीएमकडे मागणी : निलेश बारडकर

प्रतिनिधी। **नांदेड**

मुदखेड आणि मुखेडला तांत्रिक कारणामुळे ट्रिगर-१'दुष्काळी तालुक्यांच्या यादीतून वगळले या दोन्ही तालुक्यांचा समावेश व्हावा, यासाठी माजी मुख्यमंत्री खा.



अशोकराव चव्हाण यांनी जिल्हा प्रशासनापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पाठपुरावा सुरू केला आहे. त्यामुळे या दोन्ही तालुकावासीयांना आता निर्णयाची आशा निर्माण झाली आहे. दुष्काळी तालुक्यांच्या यादीतून वगळल्याचे निमित्त पुढे करत खा. चव्हाण यांच्यावर टीका करून चर्चेत येण्याचा पप्पू उर्फ तिरुपती कोंडेकर प्रयत्न असून पप्पू पुन्हा फेल म्हणत जिल्हा प्रवक्ते आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर यांनी जोरदार पलटवार केला.

राज्य सरकारने यंदा २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून नांदेड जिल्ह्यातील १६ पैकी १४ तालुक्यांचा त्यात समावेश आहे. मात्र, मुदखेड आणि मुखेडमध्ये 'ट्रिगर-१' लागू न झाल्याने हे दोन्ही पान २ वर





**मुंबई :** माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या मुंबई येथील निवासस्थानी विराजमान गणरायाला शुक्रवारी विधीवत निरोप देत विसर्जन करण्यात आले. यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह माजी आमदार सौ. अमिताताई चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, उद्योजिका सुजया चव्हाण यांची उपस्थिती होती.


### विसर्जन | 'एसडीआरएफ'ने उभी केली अभेद्य ढाल

## बाप्पाचे विसर्जन निर्विघ्न

प्रतिनिधी। **नांदेड**

गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी शुक्रवारी नांदेड शहरात मोठ्या उत्साहात विसर्जन मिरवणुका निघाल्या. या वेळी हजारो भाविकांची गर्दी आणि गोदावरी नदीपात्रातील सुरक्षेचे आव्हान लक्षात घेता धुळे टीम क्रमांक दोन राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे (एसडीआरएफ) पोलीस निरीक्षक प्रशांत राठोड व त्यांच्या समवेतील जवानांनी घाटांवर आणि नदीपात्रात अत्यंत सतर्क राहून महत्त्वाची भूमिका बजावली. प्रशासन, पोलिस आणि स्थानिक जीवरक्षकांच्या समन्वयातून विसर्जन सोहळा सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी एसडीआरएफने दिवसरात्र खडा पहारा दिला.

यंदाच्या गणेश विसर्जनासाठी नांदेडमध्ये एसडीआरएफचे ३ अधिकारी आणि २८ अमलदारांचे पथक तैनात करण्यात आले होते. गोदावरी नदीसह शहरातील विविध विसर्जन स्थळांवर संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी पथकाने अत्याधुनिक बचाव साहित्य, बोटी आणि अन्य आवश्यक साधनांसह बंदोबस्त ठेवला. गर्दीच्या काळात नदीपात्राकडे जाणाऱ्या भाविकांवर लक्ष ठेवण्याबरोबरच धोकादायक ठिकाणी जाण्यापासून त्यांना रोखण्याचे काम जवानांनी केले.यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने नदीपात्रातील पाण्याची स्थिती आणि विसर्जनाच्या वेळी निर्माण होणारी गर्दी, यामुळे प्रशासनासमोर वेगळे आव्हान पान २ वर



#### गणेशभक्तांकडून पथकाचे कौतुक

गणरायाला निरोप देताना भक्तिभाव आणि उत्साहाचा माहोल असला, तरी त्यामागे हजारो भाविकांच्या सुरक्षिततेची मोठी जबाबदारी सुरक्षा यंत्रणांवर होती. ही जबाबदारी एसडीआरएफच्या जवानांनी संयम, दक्षता आणि तत्परतेने पार पाडली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि नांदेडकरांनी एसडीआरएफ पथकाचे कौतुक करून आभार व्यक्त केले.



# भारताचा कबड्डीत ‘दुहेरी धमाका’; महिलानंतर पुरुषांनीही इराणवर मात करत जिंकले सुवर्णपदक

वृत्तसंस्था | टोकीयो

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय कबड्डी संघाचा बोलबाला पाहायला मिळाला. भारतीय कबड्डी संघाने एकाच दिवशी दोन सुवर्णपदकावर नाव कोरले. भारत आणि इराण हे दोन्ही बलाढ्य संघ आज आमनेसामने आले होते. यात भारतीय संघाने इराणवर ४०-३४ ने दमदार विजय मिळवला आणि सलग दुसऱ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्ण जिंकले. महत्वाचे म्हणजे त्याआधी आज महिला संघाने सकाळच्या सत्रात इराणविरुद्धच दणदणीत विजयाची नोंद केली. भारतीय महिला कबड्डी संघाने ३७-३४ च्या फरकाने विजय मिळवला आणि चौथ्यांदा सुवर्णपदकावर नाव कोरले.

पुरुषांच्या सामन्यात पहिल्या हाफमध्ये भारतीय संघ पिछाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये भारतीय खेळाडूंनी दमदार पुनरागमन केले आणि बलाढ्य इराणवर विजय मिळवला. इराणने सुरूवातीपासून आक्रमक खेळ केला. भारतीय खेळाडू दबाव कायम ठेवण्यात अपयशी ठरले. इराणने भारतीय संघाला ऑलआऊट करत १४-१३ ने आघाडी घेतली. ऑलआऊट झाल्यानंतर भारतीय संघाने पुनरागमन करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण, पहिल्या हाफच्या समाप्तीनंतर इराणचा संघ १८-१७ ने केवळ एक गुणाच्या फरकाने आघाडीवर होता. पहिल्या हाफमध्ये पिछाडीवर राहिल्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये भारतीय खेळाडूंनी पुनरागमन केले. सामना संपायला शेवटची ५ मिनिटे असताना, भारतीय संघाने इराणवर ५ गुणांची आघाडी घेतली. भारतीय संघाने शेवटी ९ गुणांची भक्कम आघाडी घेतली. शेवटी फुल टाईमनंतर भारतीय संघाने हा सामना ४०-३४ गुणांसह ६ गुणांनी विजय मिळवला.आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आतापर्यंत चार सुवर्णपदके मिळवली आहेत. सर्वात पहिले सुवर्णपदक भारताच्या महिला क्रिकेट संघाने मिळवले. त्यानंतर शुक्रवारी नेमबाजी मिश्रमध्ये भारताने सुवर्णपदक जिंकले. आज महिला आणि पुरुष कबड्डी संघांनी सुवर्णपदक जिंकले. १९९० ते २०२६ दरम्यान १० वेळा आशियाई क्रीडा स्पर्धा झाल्या, यापैकी नऊ स्पर्धांमध्ये भारताने कबड्डीत सुवर्णपदक मिळवले आहे. २०१८ मध्ये भारताच्या कबड्डी संघाला सुवर्णपदक मिळवता आले नव्हते. दरम्यान, भारताच्या प्राची चौधरीने शनिवारी महिलांच्या ४०० मीटर अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले. या पदकासह जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या पदकांची संख्या ३० वर पोहोचली आहे. २९ वर्षीय भारतीय धावपटू प्राची चौधरीने ५३.२१ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्यपदक पटकावले. तिने अखेरच्या ५० मीटर अंतर कापताना जीवाचे रान करत दक्षिण कोरियाच्या किम सेयूनला मागे टाकले.



## नेमबाजीत भारताची ऐतिहासिक कामगिरी

आशियाई क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी शुटिंगमध्ये कमलजीत आणि सुरूची सिंग यांनी १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात सुवर्ण पदकावर नाव कोरले आहे. कमलजीत आणि सुरूची सिंग यांनी केलेल्या गुणांची कमाई जागतिक विक्रमाच्या जवळपास पोहोचली होती. अवघ्या चार गुणांनी जागतिक विक्रम मोडता मोडता राहिला. दोघांनीही वैयक्तिक प्रकारांमधील पराभवानंतर जबरदस्त कमबॅक केले. दक्षिण कोरियाच्या सुह्योन होंग आणि गाउन चू या जोडीने भारताला शेवटपर्यंत कडवी टक्कर दिली. अखेर ४७८ गुणांसह त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. भारतीय जोडीने ४८४.६ गुणांची विक्रमी कमाई करत सुवर्णपदक पटकावले, जे जागतिक विक्रमापेक्षा अवघ्या चार गुणांनी कमी होते. दुसरीकडे, इराणच्या जोडीने ४१५.८ गुणांसह कांस्यपदक जिंकले, तर इंडोनेशियाची जोडी ३४९.४ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिली. कमलजीत मूळचा हरियाणातील रेवाडी जिल्ह्यातील सुल्खा गावचा रहिवासी आहे.

## संक्षिप्त

### उबाठा-मनसे पुन्हा मोर्चासाठी एकत्र

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार वादाच्या भोवऱ्यात सापडले असून विरोध पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. इकडे मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही एक फेसबुक पोस्ट लिहून निवडणूक आयोगाच्या आयोगाच्या कारभाराविरोधात चार ऑक्टोबरला मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. आज संजय राउत आणि राज ठाकरे यांची भेट झाली. त्यानंतर राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली. हा मोर्चा एका पक्षापुरता न राहता तर जनतेचा आवाज ठरेल यासाठी सर्व राजकीय पक्षांना या मोर्चामध्ये सहभागी व्हावे यासाठी संवाद साधला जाणार आहे.

### अंतरवाली सराटीतून उपोषण मंडप हटवला

**जालना :** मराठा आरक्षणाच्या लढ्याचे केंद्रबिंदू ठरलेल्या जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणासाठी उभारण्यात आलेला मंडप आणि व्यासपीठ आज हटवण्यात आले. २९ ऑगस्ट २०२३ पासून म्हणजेच तब्बल ३ वर्षे २७ दिवस अखंड उभा असलेला हा मंडप ग्रामस्थ आणि सरपंचांच्या निर्णयानंतर काढण्यात आला आहे. सरपंच आणि मनोज जरांगे यांची स्थानिक कोर कमिटी यांच्यात झालेल्या संवादानंतर हा मंडप काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. अंतरवाली येथील मागचे शेवटचे आंदोलन होते.

### नागालँडमध्ये विषारी दारूचे १९ बळी

**मोकोकचुंग (नागालँड) :** नागालँडमध्ये विषारी दारु प्यायल्यामुळे १९ जणांचा मृत्यू झाला आहे. नागालँडमध्ये १९९० पासून संपूर्ण राज्यात दारूबंदी लागू आहे. तरीही ही घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. गेल्या दोन दिवसांत संशयित विषारी दारू प्यायल्याने मोकोकचुंग जिल्ह्यात आठ आणि तुएनसांग जिल्ह्यात ११ जणांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आणि संशयित भेसळयुक्त दारूचा स्रोत व पुरवठा साखळीचा शोध घेण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक आय. बुंगलांग चांग यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष तपास पथक तयार केले आहे.

### ज्ञानेश कुमारांविरोधात काँग्रेसचे आंदोलन

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेसने देशव्यापी आंदोलन केले. उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्सवर भेदण्याचा प्रयत्न केला. बिहारच्या पाटण्यात पोलिसांनी आंदोलकांवर पाण्याचे फवारे मारले. दुसरीकडे, कॉकरोच जनता पक्षाने ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर ते २ ऑक्टोबरपासून देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. दुसरीकडे, ज्ञानेश कुमार उपस्थित राहणार असलेले उत्तर प्रदेशातील दोन कार्यक्रम निवडणूक आयोगाने पुढे ढकलले आहेत. आज हे कार्यक्रम होणार होते, असे सांगण्यात आले.

### मॅटराइजच्या सर्वेत काँग्रेसचा सुफडासाफ होण्याचा अंदाज

# योगींच्या नेतृत्वात भाजपाची उत्तर प्रदेशात हॅट्ट्रिक होणार!

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीची सेमीफायनल समजल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशात आगामी विधानसभा निवडणुकांचे वारे वेगाने वाहू लागले असून भाजपा, समाजवादी पक्ष, बसपा आणि काँग्रेससह सर्वच प्रमुख पक्षांनी मोर्चेबांधणी केली आहे. राज्यात गेल्या नऊ वर्षांपासून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची सत्ता कायम आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आलेल्या एका ताज्या सर्वेक्षणात भाजपा सलग तिसऱ्यांदा राज्यात स्पष्ट बहुमतासह जोरदार मुसंडी मारण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भाजपा आघाडीला तब्बल २६७ जागा मिळण्याची शक्यता असून, मुख्य विरोधी पक्ष असलेल्या सपा आघाडीला १३२ जागांवर समाधान मानावे लागू शकते. तर दुसरीकडे बसपा आणि इतरांच्या खात्यात प्रत्येकी केवळ दोन-दोन जागा जाण्याचा अंदाज या सर्वेक्षणात व्यक्त करण्यात आला आहे. न्यूज लीडर आणि मॅटराइज यांनी उत्तर प्रदेशातील सर्व ४०३ जागांवर केलेल्या ताज्या ओपिनियन पोलनुसार, राज्यात पुन्हा एकदा भाजपा आघाडीचे सरकार स्थापन होण्याचा अंदाज आहे. सर्व्हेनुसार एनडीएला एकूण २६७ जागा मिळण्याची शक्यता असून, यामध्ये एकट्या भाजपाला २४६ जागांचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मित्रपक्षांमध्ये अपना दल (एस) आणि आरएलडीला प्रत्येकी ३, निषाद पक्षाला ४ तर सुभाष्पाला १ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला आहे. या सर्वेक्षणानुसार, आज निवडणुका झाल्या तर भाजपा आघाडी सरकार स्थापन करेल. समाजवादी पक्षाच्या आघाडीला फक्त १३२ जागा मिळण्याचा अंदाज आहे. यात समाजवादी पक्षाला १२५ जागा मिळण्याचा अंदाज आहे, तर त्यांचा मित्रपक्ष असलेल्या काँग्रेसला सात जागा मिळू शकतात. सर्वेक्षणानुसार, राज्यात भाजपाला ४४ टक्के, तर सपा आघाडीला ३८ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे. याचा अर्थ दोन्ही पक्षांमध्ये सहा टक्क्यांचा लक्षणीय फरक आहे. दरम्यान, बसपाला ०.८ टक्के, तर इतरांना १० टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे, असे सर्वेत नमूद केले आहे.



### मागील निवडणुकांचे आकडे

उत्तर प्रदेशच्या मागील दोन विधानसभा निवडणुकांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास राज्यातील सत्ता समीकरणांचे रंजक चित्र स्पष्ट होते. २०१७ च्या निवडणुकीत भाजपाने ३१२ जागांचा विक्रमी आकडा गाठत ३९.७ टक्के मते मिळवली होती. २०२२ च्या निवडणुकीत भाजपाच्या जागा ५७ ने घटून २५५ वर आल्या, तरीही पक्षाच्या मतांच्या टक्क्यात वाढ होऊन तो ४१.३ टक्क्यांवर पोहोचला.

# संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भारताचा पाकला सज्जड दम


वृत्तसंस्था | जिनेव्हा

पाकिस्तान ही सैन्याची, सैन्याकडून आणि सैन्यासाठीच चालवलेली राजवट आहे. स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी पाकिस्तान सातत्याने दहशतवाद, फसवणूक आणि दुटप्पीपणाचा गैरवापर करत आला आहे, अशा शब्दांत भारताने संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत पाकिस्तानचा बुरखा फाडला. दहशतवादाचे पाकिस्तानला गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा सज्जड इशाराही भारताने यावेळी दिला.

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी महासभेत केलेल्या भाषणाला भारताने ‘प्रत्युत्तराच्या अधिकारा’चा वापर करून चोख प्रत्युत्तर दिले. संयुक्त राष्ट्रांतील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव पेटल गहलोत यांनी पाकिस्तानच्या दुटप्पीपणावर थेट प्रहार केला. गहलोत म्हणाल्या, की पाकिस्तानवर प्रत्यक्षात कोणाचे नियंत्रण आहे, याबाबत जगाने कोणत्याही भ्रमात राहू नये. स्वतःच्याच जनतेपासून राजधानीचे संरक्षण करण्यासाठी ज्या देशाला तटबंदी उभारावी लागत आहे, ती देत आहे. कारण ही व्यवस्थाच मुळात सैन्याची, सैन्याकडून आणि सैन्यासाठी चालवली जात आहे. त्यांचे बाहुले (पंतप्रधान) येतील आणि जातील; मात्र खरी सूत्रे कोणाच्या हातात आहेत, हे जगाला ठाऊक आहे. न्यूयॉर्क आणि संपूर्ण जगाने भयानक ‘९/११’ दहशतवादी हल्ल्याला २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अवघ्या पंधरवड्यात पाकिस्तानकडून अशी विधाने येणे संतापजनक असल्याचे हल्ल्याचा मुख्य सूत्रधार ओसामा बिन लादेन पाकिस्तानी लष्कराच्या मुख्य अकादमीच्या उंबरठ्यावरच आश्रय घेऊन राहत होता, हा संदर्भ विसरता येणार नाही, असे त्या म्हणाल्या. धार्मिक असहिष्णुता आणि मानवाधिकारांवर बोलणाऱ्या पाकिस्तानचा इतिहास कट्टरता आणि द्वेषाने भरलेला आहे, असा आरोप करत गहलोत म्हणाल्या, की दिवसा सुरक्षेचा आव आणणारे रात्री दहशतवादी कारवाया करतात.







### काश्मीर भारताचा अविभाज्य भाग

शाहबाज शरीफ यांनी उपस्थित केलेल्या काश्मीरच्या मुद्याचा खरपूस समाचार घेताना गहलोत यांनी भारताची भूमिका पुन्हा स्पष्ट केली. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक होता, आहे आणि कायम राहील. जर काश्मीरवरच चर्चा करायची असेल, तर जगाने आधी ‘पाकव्याप्त काश्मीर’कडे पाहिले पाहिजे. रावळकोटमधील जनतेला विचारा, तिथे कशा प्रकारे निष्पापांची हत्या, अमानुष हिंसाचार आणि मूलभूत अधिकारांची पायमल्ली वर्षानुवर्षे सुरू आहे, असे त्या म्हणाल्या.

# दुष्काळाचे पंचनामे शेतकऱ्यांसमोर करण्याचे आदेश : ना. बावनकुळे

वृत्तसंस्था | मुंबई

दुष्काळी परिस्थितीत नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे शेतकऱ्यांसमोरच आणि अचूक पद्धतीने करण्याचे निर्देश देण्यात आले असून, पंचनाम्यातील चूक शेतकऱ्यांच्या मदतीच्या आड येऊ नये, याची दक्षता घेतली जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी दिली.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असला, तरी ही संख्या अंतिम नसून परिस्थितीतील बदल आणि नव्या ‘ट्रिगर’नुसार आणखी तालुक्यांचा समावेश केला जाऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात पायाभूत सुविधांपेक्षा शेतकरी आणि शेतमजूर हेच सरकारचे प्राधान्य असेल, असे बावनकुळे यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष म्हणून बावनकुळे यांनी सरकारच्या उपाययोजनांची माहिती दिली. शासन निर्णय जारी झाल्यानंतर तातडीने त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, दुष्काळात प्रशासनाने पंचनामे किंवा निर्णयांची वाट पाहत बसण्याऐवजी प्रत्यक्ष उपाययोजना सुरू करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळ निश्चित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध निकषांनुसार पहिल्या टप्प्यात २६५ तालुक्यांचा समावेश झाला आहे. मात्र, एखाद्या तालुक्यातील परिस्थिती पुढील काळात बदलल्यास किंवा अन्य ‘ट्रिगर’ पूर्ण झाल्यास त्या तालुक्याचा समावेश करण्याचा निर्णय घेता येईल. त्यामुळे सध्या जाहीर झालेली संख्या अंतिम मानता येणार नाही, असे त्यांनी सांगितले.

# मतदारांना नोटीस आल्यास बीएलओ घरी येणार

### आता डोअर-टू-डोअर पडताळणी!

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

विशेष मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेवरून सुरू असलेल्या राजकीय वादाच्या आणि विविध चर्चांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारांना मोठा दिलासा दिला आहे. मतदारांची पडताळणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि त्रासरहित करण्यासाठी निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष सुनावणीच्या कडक नियमांमध्ये मोठी शिथिलता आणली आहे. तसेच महाराष्ट्र आणि दिल्लीत हरकती व दावे नोंदवण्याची मुदत वाढवण्यात आली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या उपस्थितीत शनिवारी आयोगाची एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत मतदारांच्या सोयीसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे, की ज्या मतदारांना माहितीतील विसंगती किंवा नोंदणीतील तफावतीबाबत नोटिसा मिळाल्या आहेत, त्यांना आता मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागणार नाही तर आता ‘बीएलओ’ थेट मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे गोळा करतील आणि ती डिजिटल प्रणालीवर अपलोड करतील. प्रत्यक्ष सुनावणी केवळ अत्यंत अपवादात्मक प्रकरणांमध्येच घेतली जाईल आणि तीही प्राधान्याने ऑनलाईन माध्यमातून होईल. सुनावणीची वेळ आलीच, तर मतदाराच्या वतीने त्याच्या कुटुंबातील अधिकृत सदस्याला उपस्थित राहण्याची मुभा देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र आणि दिल्लीमध्ये हरकती व दावे सादर करण्याची मुदत वाढवण्यात आली आहे. त्यानुसार हरकती व दावे नोंदवण्याची नवीन मुदत महाराष्ट्रासाठी १२ ऑक्टोबर असून अर्जांचा निपटारा करण्यासाठी शेवटची तारीख १० नोव्हेंबर आहे. याशिवाय बेघर, कामगार, नाईट शेल्टरमध्ये राहणारे नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना विशेष शिबिरे आणि मदत केंद्र सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाचे डिजिटल मतदार सेवा पोर्टल ‘ईसीआयनेट’ हे निवडणूक कायदे आणि नियमांनुसार योग्य प्रकारे कार्यरत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

## पान एकवरून

**राज्यात २६५ तालुक्यांत...**

आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी १२ उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत, असे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल, कृषी तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकताच राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करुन शेतकऱ्यांशी आस्थेवाईक संवाद साधला. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला. राज्याच्या कृषी आयुक्तांनी खरीप हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता जून ते आजपर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या टीगर-१ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीबाबत विहित कार्यपद्धतीची पूर्तता झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे मदत जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे पंचनामे व पीक परिस्थितीचे अचूक सर्वेक्षण करण्याच्या प्रक्रिया अचूक करण्यात येणार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, विद्यार्थी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक त्या सवलती व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत दुष्काळी परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी शासनाने विविध पातळ्यांवर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

दरम्यान, ठाणे महसूल विभागातील रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, संगमेश्वर व राजापूर तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड व वेंगुर्ला या तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्याचा यामध्ये समावेश नाही. नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील ७४ तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांचा, तर नागपूर विभागातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांचा समावेश आहे.

**सहा विभागांतील २६५ तालुक्यांचा...**

नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील एकूण ४९ तालुक्यांचा, तर पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ३५ तालुक्यांचा समावेश आहे.

**मुदखेड व मुखेडचा दुष्काळी...**

मोठा फटका बसला आहे. यंदाच्या हंगामात नांदेड जिल्ह्याच्या उत्पादनात ७०.६९ टक्के संभाव्य घट अपेक्षित आहे. मुदखेड आणि मुखेडमध्येही हेच प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या घरात आहे. याचाच अर्थ, या दोन तालुक्यांतील उत्पादनाची संभाव्य घट आणि जिल्ह्याची सरासरी घट यात फारसा फरक नाही. त्यामुळे मुदखेड आणि मुखेडची स्थिती इतर दुष्काळी तालुक्यांपेक्षा वेगळी नाही.

पावसाचा प्रदीर्घ खंड आणि पिकांचे झालेले अतोनात नुकसान पाहता, यंदा शेतकऱ्यांच्या हाती कोणतेही उत्पन्न येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे केवळ तांत्रिक निकषांवर न अडकता, विशेष बाब म्हणून पिकांची प्रत्यक्ष वाढ आणि झालेले नुकसान लक्षात घेऊन मुदखेड व मुखेड या दोन्ही तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

**चर्चेत राहण्यासाठी टीका...**

तालुके यादीबाहेर राहिले. कागदावरील निकषांमुळे शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका खा. चव्हाण यांनी घेतली आहे. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठविले असून दूरध्वनीवरूनही चर्चा केली आहे. जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाशीही त्यांनी संपर्क साधला आहे. मुदखेडमध्ये सरासरीच्या ८५ टक्के, तर मुखेडमध्ये ८१ टक्के पाऊस झाला असला, तरी एकाच दिवशी झालेल्या अतिवृष्टीमुळे ही आकडेवारी वाढलेली आहे. पावसाचे वितरण मात्र अत्यंत असमान राहिले. विशेषतः ऑगस्टमधील पावसाच्या प्रदीर्घ खंडाने पिकांची वाढ खुंटली. मुदखेडमधील पेरणी झालेल्या २१ हजार ६७१ हेक्टरपैकी १३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. मुखेडमध्ये ७५ हजार ८८८ हेक्टरपैकी तब्बल ६१ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला फटका बसला आहे. जिल्ह्याच्या कृषी उत्पादनात यंदा ७०.६९ टक्के संभाव्य घट अपेक्षित असून मुदखेड-मुखेडमधील संभाव्य घटही ६० ते ७० टक्क्यांच्या आसपास आहे. त्यामुळे प्रत्यक्ष नुकसान पाहता या दोन्ही तालुक्यांची अवस्था दुष्काळी तालुक्यांपेक्षा वेगळी नसल्याचा मुद्दा खा. चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडला आहे. पराभवानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका न घेणाऱ्यांनी आता केवळ चर्चेत राहण्यासाठी राजकीय नौटंकी करू नये, असा घणाघात बारडकर यांनी केला. खा. चव्हाण यांच्या तालमीत घडूनही विकासाच्या प्रश्नावर कोणतेही योगदान न देणाऱ्या कोंडेकरांनी आधी आपला राजकीय हिशेब जनतेसमोर मांडावा, असेही त्यांनी सुनावले. टीकेच्या राजकारणापेक्षा शेतकऱ्यांचा प्रश्न मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवून निर्णयासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे असल्याचे बारडकर यांनी स्पष्ट केले.

**ना. बावनकुळे, सावे...**

दोन वाजता दुष्काळग्रस्त भागातील पीक पाहणी दौऱ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी तीन वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या उपस्थितीत दुष्काळजन्य परिस्थितीची आढावा बैठक होईल. दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातून ते कंधार तालुक्यातील शिराढोण येथील कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण करतील. दुपारी ४.३० वाजता प्रेरणास्थळ भीमाशंकर विद्यालय परिसरात माधवराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त आयोजित मोफत महाआरोग्य शिबिराला ते उपस्थित राहतील. दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे रविवारी दुष्काळसदृश परिस्थिती व टंचाईग्रस्त भागाची पाहणी व समीक्षा करण्यासाठी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. रविवारी सकाळी ९.३० वाजत ते हदगाव, भोकर, उमरी, नायगाव व नांदेड या तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती व टंचाईग्रस्त भागाची पाहणी व समीक्षा दौरा करतील. सोईनुसार नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

**शेतकऱ्यांना वाऱ्यावर...**

शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शेतकरी व महिला शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा ऐकून घेतल्या. राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला.

**बाप्पाचे विसर्जन...**

होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने विसर्जनासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने सुरक्षेच्या उपाययोजनांवर विशेष भर दिला. पोलिस प्रशासनासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि जीवरक्षकांना संवेदनशील ठिकाणी तैनात करण्यात आले होते. विसर्जन मिरवणुका सुरू झाल्यानंतर घाटांवर भाविकांची गर्दी वाढत गेली. अनेक गणेश मंडळे ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात विसर्जनासाठी दाखल झाली. या गर्दीत एखादा भाविक पाण्यात खोलवर जाऊ नये, तसेच विसर्जनाच्या वेळी कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी एसडीआरएफच्या जवानांनी सातत्याने लक्ष ठेवले. आवश्यक ठिकाणी त्यांनी भाविकांना सुरक्षित अंतरावर ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य केले. गर्दी नियंत्रण, आपत्कालीन परिस्थितीतील तातडीची मदत आणि संभाव्य दुर्घटनेच्या वेळी बचावकार्य करण्यासाठी पथक सज्ज होते. बोटी आणि रेस्क्यू साहित्याची उपलब्धता असल्याने नदीपात्रात एखादी अनुचित घटना घडल्यास त्वरित प्रतिसाद देण्याची तयारी ठेवण्यात आली होती. त्यामुळे विसर्जनाच्या काळात सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाला मोठा आधार मिळाला. तसेच गणेशभक्तांनी सुद्धा या पथकाचे कौतुक केले आहे.







# जिल्ह्यात श्री गणरायाला वाजत-गाजत भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी। नांदेड

शहरात व जिल्हयात सर्वत्र श्री गणरायाला ढोल-ताशांच्या गजरात वाजत गाजत गणेश भक्तांनी भावपूर्ण निरोप शुक्रवारी दिला आहे. गेल्या बारा दिवसांपासून गणेश भक्तांनी श्रींची स्थापना करण्यात आली होती. अनंत चतुर्थीच्यादिवसी सर्व गणेश मंडळांनी आपापल्या श्रींच्या मूर्त्या जलाशयात विसर्जीत केल्या आहेत. मुखेड, मुदखेड, किनवट, लोहा, कंधार, बिलोली, भोकर, हदगाव, हिमायतनगर, देगलूर इत्यादी तालुक्यात श्री गणेश भक्तांनी अतिशय शांततेच्या डी.जे. मुक्त वातावरणात श्री गणरायाला वाजत गाजत निरोप दिला आहे. गणरायांच्या मिरवणुकीसमोर गणेश भक्त नाचत आपला आनंद व्यक्त



करु लागले होते. निरोपाच्या दिवसी गणेश भक्तांनी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गणेश भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकरया श्री गणारायांचे विसर्जन केले. यावेळी पोलिसांचा बंदोबस्तासाठी मोठा फौजफाटा होता.

**किनवट:** शहरातील श्रीगणरायाचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात पार पडले. यावेळी युवानेते करणभाऊ एंड्रलवार यांना सर्व गणेश भक्तांनी आरतीचा मान दिला. याप्रसंगी किनवट नगर परिषदेचे मुख्याधिकारी रोहित भगरे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी माजी नगराध्यक्ष साजिद खान, नगरसेवक प्रशांतभाऊ कोरडे, नगरसेवक प्रभू कोल्हे, नगरसेवक अनवर मिर्झा, उपाध्यक्ष हसनलाल यांचे प्रतिनिधी शहबाज लाला, अखिल भारतीय मातंग समाज संघटना अध्यक्ष गंगाधर मुकनेपेल्लीवार, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, शेख रियाज भाई, अनिल माहुरकर, सुरेश चव्हाण, पर्यवेक्षक अशोक भालेराव, जोशी, श्रीनिवास माहुरकर, कासटीवार, साईल सिरमनवार आदी मान्यवर व असंख्य गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### ओळखपत्र काढण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**रिठा :** शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर मोलाचे योगदान देणाऱ्या महिलांना अधिकृत शेतकरी म्हणून ओळख मिळावी आणि शासनाच्या विविध कृषी व कल्याणकारी योजनांचा लाभ त्यांना सुलभतेने मिळावा, यासाठी महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे पात्र महिलांना अधिकृत ओळख मिळण्याबरोबरच कृषी योजना, कृषी कर्ज, पीक विमा, कृषी निविष्ठा, कृषी विस्तार सेवा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.

### राजर्षी शाहू विद्यालयात सेवा संकल्प अभियान

**नांदेड :** राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर, नांदेडच्या प्रांगणात महाराष्ट्र शासनातर्फे चालवण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ गुरूवारी झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अमोल निळेकर प्राचार्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था नांदेड, दुसरे मार्गदर्शक जिल्हा समुपदेशक तथा विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे होते.सेवा संकल्प अभियान हे १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येत आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी करिअर गाईडन्स व मानसशास्त्रीय समुपदेशन करण्यात आले. यावेळी बालासाहेब कच्छवे यांनी मानवी यशस्वीतेचे पाच टुल्स सांगितले आणि त्याचे महत्त्व पटवून दिले.

### पं.दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी

**नांदेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये दि.२५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## इंदिरा गांधी महाविद्यालयात ऑनलाइन परिसंवाद

# पीक व्यवस्थापन हाच शाश्वत शेतीचा मार्ग : डॉ. देशमुख

प्रतिनिधी । नांदेड

बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान, पाण्याची कमतरता तसेच पिकांवरील किड व रोगांचा प्रादुर्भाव लक्षात घेता, शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींसोबत शास्त्रीय व आधुनिक पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, पोखरणी, नांदेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांनी केले.




इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, नांदेडच्या कृषी मार्गदर्शन कक्षाच्या वतीने रिलायन्स फाउंडेशन, यवतमाळ, कृषी विज्ञान केंद्र, पोखरणी आणि युवा मित्र संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'अल निनो परिस्थितीचा पिकांवरील ताण : पीक व्यवस्थापन व संरक्षणात्मक उपाययोजना' या विषयावर ऑनलाइन परिसंवाद आयोजित करण्यात आला.

डॉ. देशमुख यांनी सोयाबीन, कापूस, हळद व तूर पिकांवरील हवामानाच्या ताणाचे परिणाम स्पष्ट करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, संरक्षित सिंचन, योग्य निचरा तसेच कीड-रोग व्यवस्थापनाचे महत्त्व सांगितले. रब्बी हंगामात पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन हरभरा, करडई, जवस व भरडधान्यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांपर्यंत शास्त्रीय माहिती पोहोचविणे ही महाविद्यालयाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

डॉ. आर. बी. पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. डॉ. एल. टी. काळे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शेतकरी ऑनलाइन सहभागी झाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना डॉ. देशमुख यांनी उत्तरे दिली. डॉ. शिवराज देशमुख यांनी आभार मानले.

### जि.प.,मनपा आरोग्य विभागाचे योगदान

प्रतिनिधी । नांदेड

श्री गणेश आरोग्याचा या अभियानात जिल्हा परिषद आरोग्य विभाग, महानगरपालिका आरोग्य विभाग, श्री गुरु गोविंदसिंगजी स्मारक सामान्य रुग्णालय, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्न रुग्णालये तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संलग्न खासगी रुग्णालयांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने डॉ. चंद्रकांत मुंडे, वैद्यकीय अधिकारी, गजानन वानखेडे, समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) आणि संभाजी लोंढे, वैद्यकीय समन्वयक यांनी संबंधित संस्थांमध्ये समन्वय साधून अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योगदान दिले.

# 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानाला प्रतिसाद

प्रतिनिधी । नांदेड

गणेशोत्सवाच्या काळात भाविकांना त्यांच्या परिसरातच आरोग्य तपासणी व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानाला नांदेड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि. १४ ते २५ सप्टेंबर या १२ दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात १ हजार ४०७ आरोग्य शिबिरांचे आयोजन करून १ लाख ९ हजार १०९ भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांच्या नियोजनातून हे अभियान राबविण्यात आले. अभियानांतर्गत भाविकांना विविध वैद्यकीय तपासण्या, आवश्यक उपचार, पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन तसेच शासकीय आरोग्य योजनांची माहिती देण्यात आली.

या अभियानात ४६ हजार ९५ पुरुष, ४९ हजार १४५ महिला आणि १३ हजार ८६९ बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध वैद्यकीय विभागांच्या माध्यमातून भाविकांची तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार व पुढील वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

वैद्यकीय विभागनिहाय तपासणीमध्ये मेडिसिन विभागात ५९ हजार ८११, बालरोग विभागात १३ हजार ८६९, स्त्रीरोग विभागात ६ हजार ५७९, अस्थिरोग विभागात ५ हजार ८४४, नेत्ररोग विभागात ३ हजार ४५८, त्वचारोग विभागात ३ हजार ३९१, कान-नाक-घसा विभागात ३ हजार ४१३, तर शल्यचिकित्सा विभागात १ हजार ८८१ भाविकांची तपासणी करण्यात आली.याशिवाय २ हजार २१२ भाविकांची आयुष्मान भारत व आभा कार्डासाठी नोंदणी करण्यात आली.

# आदिलाबाद रेल्वे पिट लाईनच्या उद्घाटनाला मुहूर्त मिळेना !

प्रतिनिधी । किनवट

आदिलाबाद येथे मंजूर झालेल्या रेल्वे पिट लाइनचे काम पूर्ण झाले असून ही पिट लाइन औपचारिक उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. मात्र ही सुविधा सुरू न झाल्याने आदिलाबाद-किनवट-मुदखेड-नांदेड या मार्गावरून धावणाऱ्या अनेक गाड्यांचा विस्तार कागदावरच अडकला आहे.

नांदेड येथून सुटणाऱ्या गाड्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी २०२१ मध्ये तत्कालीन



खासदार सोयाम बापूराव यांच्या पाठपुराव्यामुळे १७.९७ कोटींचा हा प्रकल्प मंजूर झाला होता. २०२२ मध्ये कामाला सुरुवात होऊन आज काम पूर्ण झाले आहे. तरीही ही पिट लाइन अधिकृतपणे सेवेत दाखल न झाल्याने तपोवन एक्स्प्रेस व नांदेड-पनवेल एक्स्प्रेसचा आदिलाबादपर्यंत विस्तार रखडला आहे.

सदर पिट लाइन सुरू झाल्यास किनवट परिसरातील नागरिकांना थेट मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर व बंगळुरूसाठी थेट रेल्वे सेवा उपलब्ध होणार आहे. काम पूर्ण झाले असतानाही रेल्वे प्रशासन व लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष का करत आहेत? असा संतप्त सवाल नागरिकांना पडला आहे.

# एर्टिगा वाहन अपघातात तीनजण जखमी

प्रतिनिधी । किनवट

राष्ट्रीय महामार्गालगत वाढलेल्या अतिक्रमणांमुळे रस्ते अरुंद होत असतानाच गोकुंदा येथील २४ तास गजबजलेल्या ठाकरे चौकात शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. एमएच १२ डब्ल्यूएक्स ८३१५ क्रमांकाची एर्टिगा कार चौकात आदळल्याने वाहनातील सौगंधिका श्रीनिवास पप्पु, श्रीनिवास व्यंकटराव पप्पु आणि पद्मजा सिजीराव हे जखमी झाले असून, वाहनचालक



गजानन अशोक मंगरुळे यांनाही दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर वाहन औंढा नागनाथ येथून दर्शन घेऊन किनवटकडे येत होते. भाविकांना किनवट येथील अक्षरा लॉज येथे सोडण्यासाठी वाहन येत असताना चालक गजानन अशोक मंगरुळे यांना अचानक डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ठाकरे चौकात अपघात झाला, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातात सौगंधिका श्रीनिवास पप्पु यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी हैदराबाद येथे हलविण्यात आले आहे. श्रीनिवास व्यंकटराव पप्पु, पद्मजा सिजीराव आणि चालक गजानन अशोक मंगरुळे यांच्यावर गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

# उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामाला मिळाली गती

## 'आजचा जलसाठा उद्याची तहान भागविणार'

प्रतिनिधी । किनवट

शहराच्या भविष्यातील पाणीप्रश्नाचा गांभीर्याने विचार करून दूरदृष्टीने नियोजन करणाऱ्या आ. भीमराव केराम यांच्या



सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता प्रत्यक्ष कामाच्या रूपाने मूर्त स्वरूप मिळाले आहे. किनवट येथे मंजूर करण्यात आलेल्या उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, या कामामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बंधाऱ्याच्या निर्माणकामामुळे सध्या निर्माण झालेल्या पाणीसाठ्याचा उपयोग श्री गणेश विसर्जनासाठी करण्यात आल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यानिमित्ताने या प्रकल्पाचे भविष्यातील महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

आज निर्माण झालेला हा जलसाठा केवळ गणेश विसर्जनापुरता मर्यादित नसून, उद्या किनवट शहराच्या पाणीप्रश्नाला आधार देणाऱ्या मोठ्या जलसाठ्याची ही सुरुवात आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

उच्च पातळी बंधारा पूर्णत्वास गेल्यानंतर येथे मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण होईल. पावसाळ्यात हा परिसर पाण्याने भरून गेल्यानंतर किनवट शहर आणि परिसराच्या सौंदर्यात भर पडून निसर्गरम्य व विहंगम जलदृश्य निर्माण होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ विकासकाम न राहता किनवटच्या भविष्यातील जलसमृद्धीचे प्रतीक ठरणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

''आज गणेश विसर्जनासाठी उपयोगी पडणारा हा जलसाठा उद्या किनवटच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या पाण्याची गरज भागविण्याचा आधार ठरेल,'' अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत असून, आ. भीमराव केराम यांच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेचे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

किनवटच्या विकासाचा विचार केवळ आजपुरता न करता उद्याच्या पिढ्यांचा विचार करून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे 'आजचा पाठपुरावा, उद्याची जलसमृद्धी' अशी नवी ओळख निर्माण होत आहे.

दरम्यान या परिसरातील तीव्र पाणीटंचाई दूर होऊ शकेल व परिसरातील शेती व्यवसायाला याचा मोठा फायदा होईल.

# शंकरराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त उद्बोधन सत्र संपन्न

प्रतिनिधी । अर्धापूर

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त गुरुवार, दि.२४ सप्टेंबर रोजी उद्बोधन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजय टेंगसे होते.

मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ.रघुनाथ शेटे, डॉ.विशाल मस्के यांची उपस्थिती होती तर मंचावर डॉ.विनोद शिंदे, डॉ. विक्रम कुंटूरवार, कार्यक्रमाधिकारी डॉ.काजी मुक्तारोद्दिन व डॉ. नीलकंठ लांडे हे उपस्थिती होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना करताना डॉ. रघुनाथ शेटे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेमागील उद्देश, महात्मा गांधी यांचे विचार तसेच एनएसएसच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी एनएसएसच्या कार्यात हिरिरीने सहभागी होऊन समाजहिताचे उपक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच यावेळी डॉ. विशाल मस्के यांनी एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासासोबत समाजसेवेची संधी मिळते. नेतृत्वगुण, संघभावना, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव विकसित करण्यासाठी एनएसएस महत्त्वपूर्ण ठरते, असे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. अजय टेंगसे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाज व राष्ट्रसेवेची नामी संधी मिळते. विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करून देशसेवेची भावना जोपासावी आणि आपले व्यक्तिमत्त्व विकसित करावे, असे आवाहन केले.

**शैक्षणिक** — राजीव गांधी महाविद्यालय, भूगोल विभागातर्फे

# जलसंवर्धन जनजागृतीपर भित्तीपत्रिकेचे विमोचन

प्रतिनिधी । मुदखेड

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील भूगोल विभागाच्या वतीने जलसंवर्धन आणि भूजल पातळी वाढविण्याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून यशवंत महाविद्यालय, नांदेड येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवराज बोकडे उपस्थित



होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भूगोल अभ्यास मंडळातील पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

भूगोल अभ्यास मंडळाचे विद्यार्थी पंकज मेकाले आणि वेदांत भोसकर यांनी ''पाण्याची पातळी (वॉटर टेबल) वाढविण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करणे'' या विषयावर आकर्षक व माहितीपूर्ण भित्तीपत्रिका तयार केली. या भित्तीपत्रिकेत भूजल पातळी घटण्याची कारणे, त्याचे पर्यावरणीय परिणाम तसेच पावसाचे पाणी साठवण, जलसंधारण, वृक्षारोपण आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी मांडणी करण्यात आली होती.यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. शिवराज बोकडे यांनी जलसंकट ही आजच्या काळातील अत्यंत गंभीर समस्या असल्याचे सांगितले. भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची भावना ठेवून कार्य केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. पावसाच्या पाण्याचे संकलन, पारंपरिक जलस्रोतांचे संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि जलसाक्षरता यांद्वारे भविष्यातील पाणीटंचाई टाळता येऊ शकते, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता सामाजिक प्रश्नांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन केले.

**:: CHANGE IN NAME ::**
My old name is **FATEMA NAAZ NASIR AHMED KHAN** and my new name as **FATEMA NAAZ.** Henceforth I will be known by my new name **FATEMA NAAZ.** And my mother's old name is **MEH JABEEN** and new name is **MAHE JABEEN** And my father's old name is **NASEER AHMED KHAN** and new name is **NASEER AHMAD KHAN BASHEER KHAN.**
**:: Deponent ::**
FATEMA NAAZ
R/o 8-4-357 CHAUPHALA NEAR
GALIBSHA HAZRAT DARGAH ITWARA NANDED

**:: CHANGE IN NAME ::**
My old name is **MARYAM FATEMA NASEER AHMED KHAN** and my new name as **MARYAM FATEMA.** Henceforth I will be known by my new name **MARYAM FATEMA.**
And my mother's old name is **MAHJABEEN** and new name is **MAHE JABEEN** And my father's old name is **NASEER AHMED KHAN** and new name is **NASEER AHMAD KHAN BASHEER KHAN.**
**:: Deponent ::**
MARYAM FATEMA
R/o 8-4-357 CHAUPHALA NEAR GALIBSHA
DARGAH ITWARA NANDED

**:: CHANGE IN NAME ::**
My old name is **FAIZAN AHMED KHAN ABDUL RAHEMAN KHAN** which is now I am changing to **FAIZAN AHMAD KHAN.** Henceforth I will be known by my new name **FAIZAN AHMAD KHAN**
**:: Deponent ::**
FAIZAN AHMAD KHAN
R/o Dhar Road Nikhar Beauty Parlor
Osmaniya colony Parbhani

**टी.सी.हरवली**
माझी बुध्दभूषण साहेबराव कांबळे या नावाची इयत्ता बारावी पासची टी.सी. मंगलसांगवी ते नांदेड बसने प्रवास करीत असताना हरवली आहे.कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
**:: संपर्कासाठी पत्ता::**
**बुध्दभूषण साहेबराव कांबळे**
**मु.मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड**
**मो.नं. ८८०६०६३८८४**

# नद्या वाचल्या तरच भविष्य

– शशिकांत म. तोटे

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदूषण कमी करून नदी संवर्धन आणि पुनरुज्जीवनाला गती देण्यासाठी नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना राज्यात करण्यात आली. नदी पुनरुज्जीवनाचे आव्हान केवळ एखादे प्राधिकरण स्थापन करण्यापुरते मर्यादित नाही. त्यासाठी शासन, प्रशासन, उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी निश्चित करून सातत्यपूर्ण कृती आवश्यक आहे. मिठी, मुळा-मुठा, भीमा, पवना, चंद्रभागा आणि पंचगंगा यांसारख्या प्रमुख नद्यांसह महाराष्ट्रातील अनेक नद्या प्रदूषणाच्या विळख्यात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५च्या अहवालानुसार, देशातील २९६ प्रदूषित नदी पट्ट्यांपैकी ५४ पट्टे महाराष्ट्रात आहेत. हा आकडा केवळ सांख्यिकीय माहिती नाही; तो आपल्या नदी व्यवस्थापनातील गंभीर आव्हानाचा इशारा आहे. त्यामुळे नदी पुनरुज्जीवनासाठी केवळ आर्थिक गुंतवणूक पुरेशी ठरणार नाही, तर प्रभावी नियोजन, कठोर कायदे आणि त्यांची प्रामाणिक अंमलबजावणी तितकीच महत्त्वाची आहे.

भारतीय संस्कृतीत नदी म्हणजे केवळ वाहते पाणी नव्हे, तर ती जीवनवाहिनी आहे. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग, जैवविविधता, भूजल पुनर्भरण आणि मानवी संस्कृतीच्या विकासात नद्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा, तापी अशा नद्यांना आपल्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनात विशेष स्थान आहे. नदीकाठी संस्कृती विकसित झाली आणि नदीभोवती लोकजीवनाची अनेक रूपे फुलली. मात्र विकासाच्या नावाखाली आपण याच जीवनवाहिन्यांना प्रदूषणाच्या खाईत लोटत आहोत. घरगुती सांडपाणी, प्लास्टिक व घनकचरा, औद्योगिक रासायनिक प्रदूषके, शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व कीटकनाशके, शहरांमधून वाहणारे प्रक्रिया न केलेले सांडपाणी यामुळे नद्यांचे नैसर्गिक आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी नदीचे पात्र हे कचरा टाकण्याचे ठिकाण बनले आहे. काही ठिकाणी नदी वाहते की सांडपाणी वाहते, असा प्रश्न निर्माण होतो. नदी स्वच्छ करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही प्रदूषणाचे स्रोत बंद केले नाहीत, तर स्वच्छता ही केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरेल. नदीत कचरा टाकणाऱ्यावर कारवाई करण्यापेक्षा नदीतील कचरा काढण्यासाठी पुन्हा-पुन्हा निधी खर्च करणे ही व्यवस्थेची विसंगती आहे. नदीच्या उगमापासून संगमापर्यंत प्रदूषणाचे स्रोत शोधून त्यावर कायमस्वरूपी नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

नदी पुनरुज्जीवनाचा केंद्रबिंदू म्हणजे सांडपाण्याचे शंभर टक्के शुद्धीकरण. शहरातील प्रत्येक नाला नदीला मिळण्यापूर्वी त्यावर प्रभावी प्रक्रिया व्यवस्था असणे आवश्यक आहे. केवळ सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे पुरेसे नाही; ते नियमितपणे आणि निर्धारित क्षमतेने चालते की नाही, त्याची गुणवत्ता काय आहे, याची पारदर्शक तपासणी झाली पाहिजे. प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदीत सोडणाऱ्या घटकांवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. यासोबतच नदीपात्रातील अतिक्रमणे हा अत्यंत गंभीर विषय आहे. नदीचे नैसर्गिक पात्र अरुंद करणे, पूररेषेत बांधकामे करणे, नदीकाठावर अनियंत्रित शहरीकरण करणे यामुळे पुराचा धोका वाढतो आणि नदीची नैसर्गिक वहनक्षमता कमी होते. त्यामुळे नदी पुनरुज्जीवनात केवळ पाणी स्वच्छ करण्याऐवजी नदीपात्र, पूरक्षेत्र आणि नदीकाठचे पर्यावरण यांचेही संरक्षण झाले पाहिजे.

नदी म्हणजे फक्त नदीपात्रातील पाणी नव्हे. तिच्या आरोग्यासाठी संपूर्ण जलसंधारण क्षेत्र महत्त्वाचे असते. डोंगरउतारावरील वृक्षतोड, मातीची धूप, जलस्रोतांचे बुजवणे, भूजलाचा अतिवापर आणि पावसाच्या पाण्याचा अपुरा साठा यांचा परिणाम नदीच्या प्रवाहावर होतो. त्यामुळे नदी पुनरुज्जीवनासोबत जलसंधारण, वृक्षसंवर्धन, भूजल पुनर्भरण आणि पावसाचे पाणी अडविणे या उपायांनाही प्राधान्य द्यावे लागेल. नदी प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम जलजीवसृष्टीवर होतो. पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याने मासे आणि अन्य जलचरांचे अस्तित्व धोक्यात येते. जैवविविधतेचे नुकसान होते. दूषित पाणी शेतीत वापरल्यास मातीची गुणवत्ता आणि अन्नसाखळीवरही परिणाम होऊ शकतो. दूषित पाण्यामुळे जलजन्य आजार वाढण्याची शक्यता असते आणि त्याचा आर्थिक भार अखेरीस सर्वसामान्य नागरिकांवरच पडतो. या सर्व समस्यांवर शासनाची जबाबदारी मोठी आहे; मात्र नदी वाचविणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही .नदीकाठी राहणारा प्रत्येक नागरिक नदीचा पहारेकरी झाला पाहिजे. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, औद्योगिक संस्था, शेतकरी, सामाजिक संस्था आणि नागरिक यांच्या सहभागातून नदी संवर्धनाची लोकचळवळ उभी राहिली पाहिजे. शाळा-महाविद्यालयांमध्ये नदी साक्षरता निर्माण करणे, नदीकाठ स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करणे आणि स्थानिक पातळीवर नदी मित्र गट निर्माण करणे उपयुक्त ठरू शकते.



भारतीय संस्कृतीत नदी म्हणजे केवळ वाहते पाणी नव्हे, तर ती जीवनवाहिनी आहे. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग, जैवविविधता, भूजल पुनर्भरण आणि मानवी संस्कृतीच्या विकासात नद्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५च्या अहवालानुसार, देशातील २९६ प्रदूषित नदी पट्ट्यांपैकी ५४ नद्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना ही सुरुवात ठरावी, शेवट नव्हे. त्यासाठी प्रामाणिक नियोजन, कठोर अंमलबजावणी व लोकसहभागाची गरज आहे.





नदी पुनरुज्जीवनासाठी प्रदूषक भरपाई देईल या तत्त्वाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. नदीत घातक पदार्थ सोडणाऱ्या उद्योगांवर केवळ कागदी नोटिसा न बजावता प्रत्यक्ष दंड, पर्यावरणीय नुकसानभरपाई आणि आवश्यकतेनुसार कठोर प्रशासकीय कारवाई झाली पाहिजे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करून नफा कमावणाऱ्यांचा आर्थिक फायदा आणि नदीच्या पर्यावरणाचे नुकसान यांच्यातील विसंगती संपवणे गरजेचे आहे. शासकीय निधीचा वापरही पारदर्शक असला पाहिजे. नदी पुनरुज्जीवनाच्या प्रत्येक प्रकल्पाची उद्दिष्टे, खर्च, कामाची प्रगती आणि प्रत्यक्ष परिणाम जनतेसमोर उपलब्ध झाले पाहिजेत. नदी स्वच्छ झाली असे प्रमाणपत्र देण्यापेक्षा ती काही वर्षांनीही स्वच्छ आणि प्रवाही राहते आहे का, हे महत्त्वाचे आहे. आज हवामान बदलामुळे पावसाचे प्रमाण आणि वेळ अनिश्चित झाली आहे. पावसाअभावी नदीवरील पाण्याचा मुख्य स्रोत कमी होत आहे.परिणामी नदीची जलपातळी झपाट्याने खाली जाते.नद्यांचे पाणी कमी झाल्यामुळे पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण वेगाने घटत पाण्याचा दर्जा बिघडत आहे. नद्यांच्या भरलेल्या पात्रातून पाणी जमिनीत मुरते,ज्यामुळे आसपासच्या विहिरी कुपनलिकेची पाणी पातळी टिकून राहते. करिता नद्या संरक्षित असायला हव्यात.

नद्यांचे पुनरुज्जीवन ही एकदाच पूर्ण होणारी योजना नाही; ती सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. नदीच्या पाण्याची चर्चा पावसाळ्यात होते आणि उर्वरित काळात तिच्याकडे होणारे दुर्लक्ष आता परवडणारे नाही. नदीच्या आरोग्याचे नियमित परीक्षण, प्रदूषणाची सार्वजनिक माहिती, स्थानिक पातळीवरील जबाबदारी निश्चित करणे आणि नागरिकांचा सतत सहभाग या बाबी धोरणाचा अविभाज्य भाग झाल्या पाहिजेत. नदी वाचवा हा केवळ घोषवाक्याचा विषय राहू नये; तो विकासाच्या धोरणाचा मूलभूत मंत्र झाला पाहिजे. कारण नदी वाचली तर पाणी वाचेल, पाणी वाचले तर शेती वाचेल, जैवविविधता वाचेल आणि अखेरीस मानवी जीवनही सुरक्षित राहील. नदी ही निसर्गाने दिलेली संपत्ती आहे; तिचे प्रदूषण करण्याचा अधिकार कोणालाही नाही. त्यामुळे नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना ही सुरुवात ठरावी, शेवट नव्हे. नद्यांना पैसा नव्हे, तर प्रामाणिक नियोजन, कठोर अंमलबजावणी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकसहभागाची गरज आहे. आज आपण नद्यांचे रक्षण केले नाही, तर उद्याच्या पिढीला नदीचे चित्र पुस्तकात दाखवावे लागेल. म्हणूनच आजची हाक स्पष्ट आहे. नद्या वाचल्या तरच भविष्य वाचेल!


(मो: ९१३०८३५४५८)

# महाराष्ट्राचे वैश्विक पर्यटन



**पर्यटन म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, निसर्गरम्य स्थळांना भेट देणे किंवा विरंगुळा साधणे एवढ्यापुरते त्याचे स्वरूप मर्यादित राहिलेले नाही. आज पर्यटन हे सांस्कृतिक देवाणघेवाण, रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्था, पर्यावरणसंवर्धन आणि विविध समाजांना परस्परांशी जोडणारे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाराष्ट्राच्या पर्यटनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा लेख.**

– सुजाता मोरे







संयुक्त राष्ट्रांच्या मते पर्यटन हे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडलेले महत्त्वाचे क्षेत्र असून सांस्कृतिक व नैसर्गिक संपत्तीचा अनुभव घेण्याबरोबरच अनेक समाजांच्या उपजीविकेला त्यातून आधार मिळतो. २०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची अधिकृत संकल्पना 'पर्यटनाच्या पुनर्रचनेसाठी डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' अशी आहे. त्यामुळे यंदाच्या पर्यटन दिनाच्या निमित्ताने पर्यटनाच्या वाढीबरोबरच वारसा संवर्धन, स्थानिक सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यांचा विचार करणे आवश्यक ठरते. महाराष्ट्राच्या पर्यटन वैभवाचा विचार केला तर इतिहास, संस्कृती, स्थापत्य, निसर्ग आणि लोकजीवन यांचा अद्भुत संगम येथे पाहायला मिळतो. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, कोकणचा समुद्रकिनारा, प्राचीन शैललेणी, ऐतिहासिक किल्ले, मुंबईतील वैशिष्ट्यपूर्ण वास्तू, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा तसेच जैवविविधतेने समृद्ध पश्चिम घाट यांमुळे महाराष्ट्राला पर्यटनाच्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. या समृद्ध वारशातील अनेक स्थळांना युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली आहे. अजिंठा, वेरूळ आणि घारापुरीच्या प्राचीन लेण्यांपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुसमूह, पश्चिम घाट आणि २०२५ मध्ये जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया'पर्यंत महाराष्ट्राच्या जागतिक वारशाची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. हा वारसा महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि सांस्कृतिक समृद्धीची साक्ष देतानाच पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देणारा महत्त्वाचा आधार ठरतो.

जागतिक वारसा म्हणून एखाद्या स्थळाला मिळणारी मान्यता ही केवळ पर्यटनाच्या दृष्टीने मिळालेली प्रतिष्ठा नसते. महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे पाहिले असता प्राचीन बौद्ध कला, हिंदू आणि जैन स्थापत्य, शैलशिल्पकला, औद्योगिक युगातील वास्तुरचना, आधुनिक नागरी नियोजन, जैवविविधता आणि मराठा दुर्गव्यवस्था अशा विविध पैलूंचा परिचय होतो. म्हणूनच महाराष्ट्रातील वारसा पर्यटन हे इतिहास आणि वर्तमान यांना जोडणारे प्रभावी माध्यम ठरू शकते. वाघूर नदीच्या परिसरातील डोंगरकड्यांमध्ये कोरलेल्या अजिंठा लेणीमध्ये बौद्ध परंपरेशी संबंधित चैत्यगृहे, विहारे, शिल्पे आणि भित्तिचित्रे आढळतात. अजिंठ्याच्या भित्तिचित्रांमध्ये मानवी भावना, सामाजिक जीवन, पोशाख, अलंकार, राजदरबारी वातावरण आणि धार्मिक कथानकांचे कलात्मक चित्रण दिसते. त्यामुळे अजिंठा हा केवळ धार्मिक वारसा नसून प्राचीन भारतीय समाजजीवन आणि कलासंस्कृतीचा महत्त्वपूर्ण दृश्य दस्तऐवज आहे. युनेस्कोने १९८३ मध्ये अजिंठ्याचा जागतिक वारसा यादीत समावेश केला. आज देश-विदेशातील पर्यटक, संशोधक, विद्यार्थी आणि कलावंतांसाठी अजिंठा आकर्षणाचे केंद्र आहे. अजिंठ्यानंतर वेरूळ लेणी महाराष्ट्राच्या जागतिक वारशातील आणखी एक अनमोल ठेवा आहे. दोन किलोमीटरपेक्षा अधिक परिसरात पसरलेल्या ३४ लेण्यांमध्ये बौद्ध, हिंदू आणि जैन परंपरांशी संबंधित स्थापत्य आणि शिल्पकलेचा संगम दिसतो. इ.स. सहाव्या ते बाराव्या शतकादरम्यान विकसित झालेला हा लेणीसमूह प्राचीन भारतातील कलात्मक आणि तांत्रिक प्रगतीचे दर्शन घडवतो. विविध धार्मिक परंपरांच्या वास्तू एकाच परिसरात विकसित झाल्यामुळे वेरूळला सांस्कृतिक सहअस्तित्वाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील कैलास मंदिर हे एकाच खडकातून साकारलेले भव्य स्थापत्य उदाहरण आहे. खडक कापण्याचे तंत्र, वास्तूचे नियोजन, सूक्ष्म शिल्पकला आणि अभियांत्रिकी कौशल्य यांचा अप्रतिम संगम येथे पाहायला मिळतो. युनेस्कोने १९८३ मध्ये वेरूळचा जागतिक वारसा म्हणून समावेश केला.

मुंबईजवळील अरबी समुद्रातील घारापुरी बेटावरील एलिफंटा लेण्यांमध्ये शिवपरंपरेशी संबंधित भव्य शैलशिल्पांचा आविष्कार दिसतो. या शिल्पात शिवाच्या तीन पैलूंचे प्रतीकात्मक दर्शन घडते. घारापुरी बेटावर इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून मानवी वस्तीचे पुरावे असल्याचे युनेस्कोच्या नोंदीत नमूद आहे, तर शैलगृहांची निर्मिती साधारणपणे इ.स. पाचव्या-सहाव्या शतकात झाली. युनेस्कोने १९८७ मध्ये घारापुरी लेण्यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली. महाराष्ट्राच्या जागतिक वारशात आधुनिक नागरी इतिहासाचे प्रतिनिधित्व करणारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे एक महत्त्वाचे स्थळ आहे. ही वास्तू व्हिक्टोरियन गॉथिक पुनरुज्जीवन स्थापत्यशैली आणि भारतीय पारंपरिक स्थापत्यघटक यांच्या संगमाचे उदाहरण आहे. घुमट, मनोरे, टोकदार कमानी, दगडी कोरीवकाम आणि विविध अलंकारिक घटक तिच्या स्थापत्यवैशिष्ट्याला अधोरेखित करतात. मुंबईतील ओव्हल मैदानाच्या परिसरातील व्हिक्टोरियन गॉथिक शैलीतील सार्वजनिक वास्तू आणि त्याच्या पश्चिमेकडील आर्ट डेको इमारती मुंबईच्या नागरी विकासाच्या दोन महत्त्वपूर्ण टप्प्यांचे प्रतिनिधित्व करतात.

महाराष्ट्राच्या जागतिक वारशात नैसर्गिक संपत्तीचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे. पश्चिम घाट हा महाराष्ट्रासह अनेक राज्यांत पसरलेला प्राचीन पर्वतीय प्रदेश आहे. युनेस्कोच्या मते पश्चिम घाट हिमालयापेक्षा जुना असून त्याचे पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. येथील पर्वतीय वनव्यवस्था भारतीय मान्सूनच्या हवामानावर प्रभाव टाकते. युनेस्कोने पश्चिम घाटाच्या नैसर्गिक वारशाला जागतिक महत्त्व दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पश्चिम घाट परिसरात निसर्गभ्रमंती, पक्षीनिरीक्षण, जैवविविधता अभ्यास, गिरिभ्रमण आणि पर्यावरणशिक्षण यांसारख्या पर्यटनप्रकारांना मोठी संधी आहे. परंतु निसर्गपर्यटनाच्या नावाखाली अनियंत्रित बांधकाम, जंगलांवरील दबाव, प्लास्टिक कचरा, जलप्रदूषण आणि पर्यटकांची अनियंत्रित गर्दी वाढणे टाळणे आवश्यक आहे. निसर्ग हा पर्यटनाचा उपभोग घेण्याचा विषय नसून संवर्धनासह अनुभवण्याची सामूहिक संपत्ती आहे.

महाराष्ट्राच्या जागतिक पर्यटनाच्या नकाशावर अलीकडील काळात झालेली महत्त्वाची भर म्हणजे 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया'. २०२५ मध्ये या मालिकेचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला. या मालिकेत बारा प्रमुख किल्ल्यांचा समावेश आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, खांदेरी, प्रतापगड, राजगड, पन्हाळा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग हे अकरा किल्ले आहेत, तर जिंजी किल्ला तमिळनाडूमध्ये आहे. हे किल्ले सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीपर्यंत बांधले, विकसित किंवा विस्तारले गेले. डोंगराळ आणि सागरी भूभागाचा संरक्षणव्यवस्थेसाठी केलेला कल्पक वापर हे या दुर्गव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. युनेस्कोने या किल्ल्यांच्या जाळ्याला मराठा लष्करी रणनीती आणि भूगोलाशी एकरूप झालेल्या संरक्षणव्यवस्थेचे प्रतिनिधित्व मानले आहे. या नव्या जागतिक वारसा मान्यतेमुळे महाराष्ट्राच्या दुर्गपर्यटनाला आंतरराष्ट्रीय संदर्भ प्राप्त झाला आहे. विशेषतः नाशिक जिल्ह्यातील साल्हेर किल्ल्याचा या वारसा मालिकेत समावेश झाल्यामुळे नाशिकच्या पर्यटनात ऐतिहासिक दुर्गसंस्कृतीचा महत्त्वपूर्ण आयाम अधिक ठळक झाला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे सागरी किल्ले समुद्री संरक्षणव्यवस्थेची आणि किनारी भूगोलाशी जुळलेल्या इतिहासाची ओळख करून देतात. दुसरीकडे रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, पन्हाळा आणि साल्हेरसारखे किल्ले सह्याद्रीच्या भूगोलाशी जोडलेल्या दुर्गव्यवस्थेचे दर्शन घडवतात. त्यामुळे महाराष्ट्रात वारसा किल्ल्यांचे पर्यटन विकसित करताना केवळ किल्ल्यांची वास्तू न दाखवता त्यांचा भूगोल, स्थानिक समाज, लोकपरंपरा, जैवविविधता आणि ऐतिहासिक संदर्भ पर्यटकांसमोर मांडणे आवश्यक आहे.

जागतिक वारसा स्थळांचे पर्यटन स्थानिक समाजाच्या विकासाशी जोडले गेले तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. वारसा स्थळांच्या परिसरातील युवकांना प्रशिक्षित पर्यटनमार्गदर्शक, वारसा-दुभाषे आणि डिजिटल माहितीसेवा पुरवठादार म्हणून संधी देता येऊ शकते. २०२६ च्या जागतिक पर्यटन दिनाची 'डिजिटल कार्यसूची आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' ही संकल्पना महाराष्ट्रातील वारसा पर्यटनाला नवी दिशा देऊ शकते. महाराष्ट्रातील सर्व वारसा स्थळांमधून महाराष्ट्राची ओळख देशाच्या सीमा ओलांडून जगापर्यंत पोहोचते. पर्यटनाच्या माध्यमातून विविध प्रदेशांतील आणि देशांतील लोक या वारशाशी परिचित होतात. त्यामुळे पर्यटन हे केवळ आर्थिक व्यवहार न राहता सांस्कृतिक संवादाचे आणि परस्पर समज वाढविण्याचे माध्यम बनते. जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांकडे केवळ पर्यटक म्हणून नव्हे, तर वारशाचे संवर्धक म्हणून पाहण्याची गरज आहे. जागतिक वारशातून महाराष्ट्राच्या पर्यटनाला शाश्वत, सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक आणि स्थानिक समाजाच्या विकासाला हातभार लावणारी दिशा मिळाली, तर जागतिक पर्यटन दिनाचा संदेश खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

**(लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)**

# किती हे ओझे...




**आजचा तरुण आतून खरंच आनंदी आहे का? शिक्षण, करिअर, नोकरी, आर्थिक स्थैर्य, कुटुंबाच्या अपेक्षा आणि समाजातील वाढती स्पर्धा यांचा दबाव तरुणांच्या मनावर परिणाम करत आहे. प्रत्येकाला चांगले गुण मिळवायचे आहेत, चांगली नोकरी मिळवायची आहे, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हायचे आहे आणि इतरांपेक्षा पुढे जायचे आहे. या धावपळीत मात्र स्वतःच्या मनाची अवस्था काय आहे, याकडे अनेकदा दुर्लक्ष होते.**

– अनिल पवळे

स्पर्धेच्या युगात यशाची धडपड करताना तरुणांनी स्वतःला हरवू नये. आजचा तरुण पूर्वीपेक्षा अधिक हुशार, तंत्रज्ञानस्नेही आणि संधींच्या जवळ आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया,ए.आय.तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षणामुळे जगभरातील माहिती काही क्षणांत त्याच्यापर्यंत पोहोचते. मात्र या वेगवान जगात एक प्रश्न गंभीरपणे समोर येतो. आजचा तरुण आतून खरंच आनंदी आहे का? शिक्षण, करिअर, नोकरी, आर्थिक स्थैर्य, कुटुंबाच्या अपेक्षा आणि समाजातील वाढती स्पर्धा यांचा दबाव अनेक तरुणांच्या मनावर परिणाम करत आहे. प्रत्येकाला चांगले गुण मिळवायचे आहेत, चांगली नोकरी मिळवायची आहे, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हायचे आहे आणि इतरांपेक्षा पुढे जायचे आहे. या धावपळीत मात्र स्वतःच्या मनाची अवस्था काय आहे, याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. ''तुझ्या मित्राला एवढे गुण मिळाले'', ''त्याला नोकरी मिळाली'', ''तो परदेशात गेला'', ''तू अजून काय केलेस?'' अशा प्रश्नांमुळे तरुणांच्या मनावर नकळत दबाव निर्माण होतो. पालकांच्या अपेक्षा वाईट नसतात. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने यशस्वी व्हावे, असेच वाटते. मात्र सततची तुलना, अपयशाची भीती आणि इतरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा ताण तरुणाला मानसिकदृष्ट्या थकवू शकतो.

सोशल मीडियामुळे दुसऱ्यांचे आयुष्य आपल्यापेक्षा अधिक सुंदर आणि यशस्वी वाटू लागते. कुणाचे महागडे वाहन, कुणाचा परदेशातील प्रवास, कुणाचे यश किंवा कुणाचे आकर्षक जीवन पाहून अनेक तरुण स्वतःच्या आयुष्याची तुलना करू लागतात. परंतु सोशल मीडियावर दिसणारे आयुष्य हे संपूर्ण सत्य नसते. एखाद्याच्या आयुष्यातील काही सुंदर क्षण पाहून आपण आपल्या संपूर्ण आयुष्याची तुलना करणे योग्य नाही. प्रत्येकाच्या आयुष्याची वेळ, परिस्थिती आणि संघर्ष वेगळा असतो.

शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अपेक्षित नोकरी न मिळणे ही अनेक तरुणांसमोरील मोठी समस्या आहे. स्पर्धा परीक्षा, खासगी नोकरी, व्यवसाय किंवा इतर करिअरच्या पर्यायांमध्ये सतत प्रयत्न करताना अनेकदा निराशा येते. त्यातून व्यसनाचे व आत्महत्याचे प्रमाण वाढत आहे. मात्र अपयश म्हणजे जीवनाचा शेवट नाही. अपयश हा पुढच्या प्रयत्नासाठी मिळालेला अनुभव असतो. एका परीक्षेत किंवा एका मुलाखतीत अपयश आले म्हणून एखादी व्यक्ती अपयशी ठरत नाही.

मानसिक ताण कमी करण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संवाद. तरुणांनी आपल्या मनातील अडचणी विश्वासू व्यक्तीसमोर मोकळेपणाने व्यक्त करायला हव्यात. पालकांनीही मुलांच्या प्रत्येक समस्येवर लगेच सल्ला देण्याऐवजी प्रथम त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे गरजेचे आहे. कधी कधी एखाद्याला उपायापेक्षा फक्त ''मी तुझ्यासोबत आहे'' हे ऐकण्याची गरज असते. यश महत्त्वाचे आहे; पण आरोग्य आणि मनःशांती त्याहून महत्त्वाची आहे. नियमित व्यायाम, पुरेशी झोप, छंद जोपासणे, मित्र-परिवारासोबत वेळ घालवणे, निसर्गाच्या सान्निध्यात राहणे आणि मोबाईलचा मर्यादित वापर यामुळे जीवनात सकारात्मक बदल घडू शकतो. सगळ्यांपेक्षा पुढे जाण्याची गरज नाही. कालच्या स्वतःपेक्षा आज आपण थोडे चांगले झालो, तरी तेही मोठे यश आहे. आजच्या तरुणांकडे क्षमता आहे, ऊर्जा आहे आणि मोठी स्वप्ने आहेत. गरज आहे ती फक्त या स्वप्नांच्या प्रवासात स्वतःला जपण्याची. समाजाने तरुणांकडून केवळ ''यश'' मागण्याऐवजी त्यांना समजून घेण्याची गरज आहे. पालकांनी तुलना करण्याऐवजी प्रोत्साहन द्यावे, शिक्षकांनी गुणांसोबत आत्मविश्वास निर्माण करावा आणि तरुणांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा. कारण आयुष्य ही शर्यत नाही; तो एक प्रवास आहे. या प्रवासात यश मिळवताना मनःशांती हरवली, तर मिळवलेले यशही अपूर्णच राहते. आजच्या तरुणांना फक्त यशस्वी बनवण्याची नव्हे, तर समाधानी, आत्मविश्वासू आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे.

(मो. ९८९०२३२९६२)

सत्यप्रभा

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com

र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०

e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### गणेश विसर्जन, पाण्यात बुडून मृत्यू

**परळी वैजनाथ :** गणेश विसर्जनासाठी गेलेल्या आदिनाथ भाऊराव जाधव (वय २०) या युवकाचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. परळी तालुक्यातील कौठळी येथे २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. उपजिल्हा रुग्णालयात मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला

**आष्टी :** तालुक्यातील पिंपरी घाटा शिवारात महामार्गालगत अंदाजे २५ ते ३० वर्षे वयोगटातील अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाजवळ ओळख पटविणारी कोणतीही कागदपत्रे किंवा माहिती मिळाली नाही. तरुणाच्या उजव्या हातावर इंग्रजीत ‘’ व ‘’ तसेच मराठीत ‘अभिषेक’ असे गोंदलेले आहे. डाव्या मनगटावर त्रिशूळ, डमरू आणि गिअर बॉक्सचे चिन्ह असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पोळ्याला मारहाण, जखमीचा मृत्यू

**बीड :** तालुक्यातील अंथरवण पिंप्री येथे बैलपोळ्याच्या दिवशी झालेल्या मारामारीत जखमी झालेल्या बबन गुलाब पवार (४३) यांचा संभाजीनगर येथे उपचार सुरू असताना मृत्यू झाला. संतप्त नातेवाईकांनी मृतदेह पिंपळनेर पोलिस ठाण्यात आणून आरोपींच्या अटकेची मागणी केली. पोलिसांनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर मध्यरात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे.

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**जालना :** पीरपिंपळगाव येथे अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून दिलेल्या धडकेत कैलास दिलीप मिसाळ (२६) यांचा मृत्यू झाला. जिल्हा परिषद शाळेसमोर हा अपघात झाला. गंभीर जखमी कैलास यांचा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक पसार झाला. अंत्यसंस्कारानंतर त्यांचे भाऊ विलास मिसाळ यांनी चंदनझिरा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### विदेशी दारू वाहतूक, दोघांवर कारवाई

**उमरगा :** येणेगूर–सुपतगाव रस्त्यावरून बेकायदा विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांवर मुरुम पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी कारमधून विदेशी दारूचे १९ बॉक्स जप्त केले. त्यामध्ये रॉयल इम्पॅक्ट ग्रीन व्हिस्कीच्या २३९ सीलबंद बाटल्या आढळल्या. प्रत्येकी १४० रुपये किमतीच्या या दारूसह कार असा एकूण ४ लाख ३३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

### संभाजीनगर पालिका, थकबाकीची वसुली

**छत्रपती संभाजीनगर :** थकीत मालमत्ताकराच्या वसुलीसाठी महापालिकेने शहरातील थकबाकीदारांविरोधात धडक मोहीम राबविली. विविध झोनमधील कर वसुली पथकांनी १८ मालमत्तांवर कारवाई करून सुमारे २० लाख रुपयांची वसुली केली. काही मालमत्तांना सील ठोकण्यात आले, तर काहींकडून थकीत रकमेचे धनादेश घेण्यात आले. आयुक्त अमोल येडगे यांच्या आवाहनानंतर अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

---

परभणी येथे सरण आंदोलनातून वेधले लक्ष

# अंत्यविधीसाठी जागेचा संघर्ष

प्रतिनिधी | **परभणी**

जिल्ह्यातील भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांना मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यांना अनेक गावांमध्ये स्वतंत्र स्मशानभूमी नाही. परिमाणी काही ठिकाणी तणावाचे प्रसंगही निर्माण होत आहेत. त्यामुळे भटक्या विमुक्तांकडून ‘गाव तिथे स्मशानभूमी’ आणि ‘एक गाव, एक स्मशानभूमी’ या मागण्या करण्यात येत आहेत.

मृत व्यक्तीला सन्मानाने अखेरचा निरोप देण्यासाठीही हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी सत्यशोधक युवा संघाच्या वतीने नुकतेच ‘सरण आंदोलन’ करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये संबंधित समाजातील नागरिकांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी नसल्याने अंत्यविधीच्या वेळी गंभीर अडचणी निर्माण होत असल्याचे सत्यशोधक युवा संघाने निवेदनात म्हटले आहे. काही ठिकाणी स्मशानभूमीच्या जागेवरून वाद आहेत, तर काही गावांमध्ये इतरांच्या शेतात अथवा उपलब्ध मोकळ्या जागेत अंत्यविधी करण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. त्यामुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांची मोठी गैरसोय होत आहे. परभणी तालुक्यातील साडेगाव, तरोडा, नर्सापूर, पूर्णा तालुक्यातील खुजडा तसेच परभणी शहरालगतच्या सोनगा आदी गावांमध्ये स्मशानभूमीच्या जागेचा प्रश्न असल्याचे संघाने सांगितले. गंगाखेड तालुक्यातील खळी गावातील एका महिलेचे नुकतेच निधन झाले. मात्र, गावात अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याने तिचा अंत्यविधी गंगाखेड शहरात करावा लागल्याचे निवेदनात नमूद केले आहे.




#### ग्रामविकास मंत्र्यांच्या वक्तव्याचा संदर्भ

स्मशानभूमीच्या जागेवरून वाद असलेल्या गावांमध्ये प्रशासनाने समिती स्थापन करून प्रत्यक्ष पाहणी करावी आणि वादावर योग्य तोडगा काढावा, अशीही मागणी संघाने केली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधिमंडळात केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देत या प्रश्नावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

---

## कुंडलीदोषाच्या नावे मुलीवर अत्याचार

प्रतिनिधी | **लातूर**

कुंडलीतील दोष दूर करण्याच्या नावाखाली अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. यातून ती मुलगी गरोदर राहिल्याचा धक्कादायक प्रकार लातूर शहरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी महाराज म्हणून वावरणाऱ्या भोंदूबाबाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलीच्या पत्रिकेत कुंडली दोष असल्याचे सांगून तो दूर करण्यासाठी शारीरिक संबंध ठेवणे आवश्यक असल्याचे रामेश्वर हनुमंतराव रामदासी (वय ४४, रा. लातूर) या भोंदूबाबाने सांगितले होते. त्यानंतर पूजा करण्याच्या बहाण्याने मुलीच्या घरी जाऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात पोक्सो सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

नोंदणीसाठी ऑनलाईन सुविधा

# पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणीचे आवाहन

प्रतिनिधी| **हिंगोली**

भारत निवडणूक आयोगाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी पात्र मतदारांनी मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी हिंगोली जिल्ह्यात आजपर्यंत ९ हजार ९९ मतदारांची नोंदणी झालेली आहे. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. पात्र पदवीधरांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र पदवीधर नवमतदारांनी https://mahaelection.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन मतदार नोंदणी करावी. उपलब्ध ऑनलाइन सुविधेचा वापर करून विहित मुदतीत मतदार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी निवडणूक प्रगती चौडेकर उपस्थित होते.

#### आचारसंहिता लागू

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने २२ सप्टेंबर २०२६ पासून हिंगोली जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

---

केज तालुक्यातील धक्कादायक प्रकार

# ई–पीक पाहणीत जुनेच फोटो, सहाय्यकावर गुन्हा

प्रतिनिधी | **बीड**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे ई–पीक पाहणी करताना प्रत्यक्ष प्लॉटवर जाऊन उभ्या पिकाचे फोटो न घेता जुने फोटो अपलोड केल्याप्रकरणी ई–पीक पाहणी सहाय्यकावर गुन्हा दाखल करण्यात आला. रामदास सारूक, असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील रामदास सारूक या सहाय्यकाने १९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत ई–पीक पाहणी करताना प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या प्लॉटवर जाऊन उभ्या पिकाचे सद्य स्थितीतील फोटो न घेता त्याच्या मोबाईलमधील जुने फोटो अपलोड केल्याचे निदर्शनास आले होते.

#### गुन्हा दाखल करण्यास उशीर

तहसीलदार गंगावणे यांनी ७ सप्टेंबर रोजी ग्राम महसूल अधिकारी अश्विनी लक्ष्मण गुळभिले यांना एका पत्रान्वये प्राधिकृत करून गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. २४ सप्टेंबर रोजी अश्विनी गुळभिले यांच्या तक्रारीवरून फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला.

---

सामूहिक प्रयत्नातून चळवळ गतिमान व्हावी, मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांचे प्रतिपादन

# आरोग्य संपन्न गाव अभियान, हिंगोली जिल्ह्यात वेग

प्रतिनिधी | **हिंगोली**

ग्रामीण भागातील नागरिकाचे आरोग्यमान उंचावणे आणि तळागाळातील घटकांपर्यंत दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी आरोग्य विभागातर्फे १ एप्रिल २०२६ पासून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात सामूहिक प्रयत्नातून आरोग्य चळवळ गतिमान करावी, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले.

जिल्हा परिषदेतील सभागृहामध्ये आयोजित जिल्हास्तरिय कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्ह्यातील सर्व ५६३ ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान एक व्यापक लोकचळवळीच्या रूपात राबवून, स्वत:ला झोकून देत काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) समृध्दी दिवाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) विजय बोराटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शिवाजी बुचाले, कार्यकारी अभियंता राजू नरवाडे, उपशिक्षणाधिकारी आसावरी काळे यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी सर्व विभागाने एकत्र येऊन समन्वयाने काम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे सांगितले. प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी ग्रामपंचायतींचे गुणांकन करण्याची पद्धत, मूल्यमापनाचे निकष आणि विजेत्या ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या पारितोषिकांची माहिती उपस्थितांना दिली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानाची रुपरेषा मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये यांनी केले. तर आभार जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांनी मानले. यावेळी सर्व गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्राम विकास अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा वर्कर उपस्थित होत्या.




#### घरापासून जवळ मोफत आरोग्यसेवा

ग्रामीण भागातील शेवटच्या घटकातील नागरिकाला त्याच्या घरापासून जवळ, सर्वसमावेशक, मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे या अभियानाचे मुख्य ध्येय आहे. यासाठी ३१ मार्चपर्यंत सर्व पूर्वतयारी व नियोजित कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी यावेळी दिले.

---



२ ऑक्टोबरपर्यंत स्वच्छता उपक्रम

# स्वच्छता ही सेवा अभियान पंचायत समितीत श्रमदान

प्रतिनिधी | **हिंगोली**

पंचायत समितीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अभियानास प्रारंभ केला. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत हिंगोली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात विविध स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या अभियानांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, परिसर स्वच्छ ठेवणे, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती तसेच स्वच्छतेच्या उपक्रमांमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. स्वच्छ व निरोगी गावांच्या निर्मितीसाठी नागरिकांनीही या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पंचायत समिती हिंगोली येथे झालेल्या श्रमदान उपक्रमात पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियान यशस्वी करण्याचा संकल्प केला.

---

## भटके–विमुक्त प्रवर्ग शिबिरांचे आयोजन

प्रतिनिधी | **हिंगोली**

विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना आवश्यक शासकीय प्रमाणपत्रे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा, यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत विशेष ‘भटके–विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान’ राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय यांनी केले आहे.

प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने हे विशेष अभियान आयोजित करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत २७ सप्टेंबर रोजी हिंगोली तालुक्यातील कोथळज येथे, २८ सप्टेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील सुखापूर येथे आणि २९ सप्टेंबर रोजी कळमनुरी तालुक्यातील पोतरा येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

---

जिल्ह्याच्या पाहणी दौऱ्यानंतर मुख्यमंत्र्यांकडून निर्णय

# धाराशिव जिल्ह्याला उजनी धरणातून एक टीएमसी पाणी देण्याचे निर्देश

प्रतिनिधी | **धाराशिव**

जिल्ह्यातील गंभीर पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उजनी धरणातून धाराशिव जिल्ह्यासाठी एक टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाला दिल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी २३ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील दुष्काळी भागाची पाहणी केली. यावेळी करजखेडा येथील पाहणीदरम्यान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पूर्णतः कोरडा पडलेला पाटबंधारे तलाव दाखवत जिल्ह्यातील पाण्याची गंभीर परिस्थिती मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच उजनी धरणातून एक टीएमसी पाणी रामदरा तलावात आणण्याची मागणी केली होती. जिल्ह्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने विविध जलप्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा केवळ आठ टक्के राहिला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह पशुधनासाठी पाणी उपलब्ध करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. उजनी धरणातून भीमा–सीना बोगद्याद्वारे सीना नदीत पाणी सोडून घाटणे बॅरेजच्या माध्यमातून रामदरा तलाव भरण्याचे नियोजन आहे.

जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांत पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसाअभावी पिके करपली असून, हिरवा चारा उपलब्ध नाही.



#### पाणी चाचणीसाठी उपयुक्त निर्णय

उजनीचे पाणी धाराशिवपर्यंत आणण्यासाठी सुरू असलेल्या कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा आहे. उपसा सिंचन योजनेचे काम अंतिम टप्प्यात असून, ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात चाचणी घेण्याचे नियोजन आहे. रामदरा, सिंदफळ व पांगरदरवाडी तलावांत पाणी उपलब्ध झाल्यास दुष्काळी काळातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होणार आहे.

---

## लोकसंवाद कार्यक्रम, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

प्रतिनिधी | **हिंगोली**

किशोरवयीन विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य, लैंगिक आरोग्य आणि एचआयव्हीविषयी योग्य माहिती देण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन शासकीय नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य उद्धव हिंगमिरे यांनी केले. जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित ‘लोकसंवाद’ कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, कुलदीप कांबळे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी यांनी किशोरवयीन विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही, एड्सविषयी जागृती निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी बजावावयाच्या भूमिकेबाबत मार्गदर्शन केले. एचआयव्हीचा प्रसार रोखण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

---

**योजनांचा लाभ** हिंगोली जिल्ह्यात २५ गावांत विशेष शिबिरे ; ७०० प्रमाणपत्रांचे वितरण

# सेवा संकल्प अभियानातून गरजू लाभार्थ्यांना सेवा

प्रतिनिधी| **हिंगोली**

शासनाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गरजू व पात्र नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा, प्रमाणपत्रे तसेच विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्ह्यात एकही पात्र नागरिक शासकीय सेवा व योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी अभियानाच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी निवडणूक प्रगती चौंडेकर उपस्थित होते. जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, सेवा संकल्प अभियानांतर्गत हिंगोली जिल्ह्यात प्रारंभी २५ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रे, विविध शासकीय सेवा तसेच योजनांचा लाभ मिळत आहे किंवा नाही, याची माहिती घेण्यात आली आहे. पात्र असूनही आवश्यक प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, अशा नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून प्रशासन थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. निवडलेल्या २५ गावांमध्ये आयोजित विशेष शिबिरांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ७०० प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. सेवा संकल्प अभियान केवळ प्रारंभी निवडलेल्या २५ गावांपुरते मर्यादित न ठेवता टप्प्याटप्प्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. प्रारंभीच्या गावांमध्ये अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतल्यानंतर नागरिकांच्या गरजा आणि उपलब्ध सेवांचा विचार करून पुढील टप्प्यात अभियान अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासकीय सेवा व योजनांचा लाभ पोहोचविण्यास मदत होणार आहे.




#### पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

१७ सप्टेंबर रोजी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करून सेवा संकल्प अभियानाचा जिल्ह्यात प्रारंभ करण्यात आला. या अभियानातून नागरिकांच्या अडचणी स्थानिक पातळीवर जाणून घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

---

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील घटना

# कर्जफेडीच्या चिंतेतून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी| **शिरूर अनंतपाळ**

पावसाचा खंड पडल्यामुळे यंदा पिकांचे नुकसान झाल्याने कर्जफेडीची चिंता सतावत असलेल्या लातूर जिल्ह्यातील ३३ वर्षीय तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथे २५ सप्टेंबर रोजी घडली. अंकुश रमेश काळे, असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

अंकुश काळे यांच्याकडे दोन एकर कोरडवाहू शेती होती. वृद्ध आई–वडील, पत्नी, आठ वर्षांचा मुलगा आणि सहा वर्षांची मुलगी अशा सहा जणांच्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर होती. शेतीतून मिळणारे उत्पन्न अपुरे असल्याने ते स्वतःच्या शेतीसोबतच गावातील इतर शेतकऱ्यांकडे सालगडी म्हणून काम करत होते. काळे यांच्यावर एक लाख ४० हजार रुपयांचे कर्ज होते. पीक हातचे गेल्यानंतर कर्ज फेडायचे कसे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या चिंतेतून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे.

#### मदतीचा प्रस्ताव



मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाकडून मिळणाऱ्या सानुग्रह मदतीसाठी महसूल विभागाकडून प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### नरसी येथे गणेश विसर्जन उत्साहात

**नरसी:** शहरात विविध गणेश मंडळाचे गणेश विसर्जन गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या गणपती चालले गावाला चैन पडेना जीवाला या जयघोषात ढोल ताशाच्या गजरात पार पडले. नरसी शहरातील श्री विघ्नहर्ता गणेश मंडळांने मुख्यता मागील दहा दिवसात रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर,किर्तन सेवा या सामाजिक व धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून गणेश उत्सव साजरा केला.

### बिलोलीत गणेश विसर्जन उत्साहात

**बिलोली:** शहर तथा परिसरामध्ये यंदाचा गणेशोत्सव आगळा वेगळा असाच ठरला. शहरातील अनेक गणेश मंडळानी अकराही दिवस अनेक सामाजिक उपक्रम राबविले ज्यामध्ये बागेतील हनुमान मंदिर येथील मंडळाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, रक्तदान शिबीर,नृत्य व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.

### १ हजार २६९ नागरिकांना नोटिसा

**लोहा:** विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत लोहा शहरातील मतदार यादीतील संबंधित नोंदींची पडताळणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेत आवश्यक कागदपत्रे व पुरावे तपासणे आवश्यक असलेल्या १,२६९ नागरिकांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही सुरू आहे.नोटीस प्राप्त झालेल्या नागरिकांना त्यांच्या मतदार नोंदीच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करून आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली आहे.

### कबड्डी स्पर्धेत नांदेड 'क' झोनची बाजी

**नांदेड:** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर येथे दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत नांदेड 'क' झोनच्या संघाने दमदार कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. साखळी पद्धतीने पार पडलेल्या या स्पर्धेत नांदेड 'क' झोनच्या खेळाडूंनी आक्रमक चढाया आणि भक्कम पकडींचे प्रभावी प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली.

### अंजली गुडमलवार यांची निवड

**मुदखेड :** येथील बुरुड समाजातील गुणवंत विद्यार्थिनी अंजली शंकर गुडमलवार हिची आयडीबीआय बँकेच्या 'ज्युनिअर असिस्टंट पदी निवड झाली आहे.अंजली गुडमलवार हिच्या या



उल्लेखनीय यशामुळे तिच्या कुटुंबाचा व संपूर्ण बुरुड समाजाचा नावलौकिक वाढला असुन तिच्या या यशाबद्दल मुदखेड तालुका व परिसरातील नागरिक, स्नेही व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे व तिच्या पालकांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

### सुशीलाबाई कुंकनोर यांचे निधन

**बिलोली:** तालुक्यातील सुलतानपूर येथील सुशीलाबाई भीमराव कुंकनोर वय ६५ यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सुलतानपुर येथे अंत्यसंस्कार करण्यात



आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, नातू जावई असा परिवार आहे.


केदार जगद्गुरू, माजी मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांची प्रमुख उपस्थिती

# लोकनेते माधवराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे आज अनावरण

प्रतिनिधी । **शिराढोण**

तालुक्यातील शिराढोणचे सुपुत्र तथा पंचायत समिति कंधारचे माजी सभापती,लोकनेते माधवराव गोविंदराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचा भव्य सोहळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी शिराढोण येथे आयोजित करण्यात आला आहे. केदार पीठाचे जगद्गुरु श्रीश्रीश्री १००८ श्री भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न होणाऱ्या या सोहळ्यास राज्याचे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण हे अध्यक्ष राहणार असून राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिति राहणार आहे.

कंधार तालुक्यातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासोबतच परिसराच्या विकासाला प्राधान्य देत माधवराव पांडागळे यांनी सार्वजनिक जीवनात ठसा उमटविला. माजी गृहमंत्री शंकरराव चव्हाण आणि माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमातून त्यांनी शिराढोणसह तालुक्यात विविध विकासकामांसाठी पाठपुरावा केला. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहावी, यासाठी शिराढोणवासीयांनी पूर्णाकृती पुतळा उभारण्याची इच्छा व्यक्त केली होती. अखेर ही इच्छा प्रत्यक्षात येत असून, पुतळ्याच्या अनावरणासाठी गाव सज्ज झाले आहे.या निमित्ताने सोमवारी दिवसभर विविध कार्यक्रमांचे



आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाआरोग्य शिबिर होणार असून, परिसरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येणार आहे. दुपारी १ ते ३ या वेळेत ह.भ.प. समाधान महाराज शर्मा (केज) यांचे भव्य कीर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी ३.०५ वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माधवराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात येईल. याच कार्यक्रमात 'लोकनेता' या स्मृतीग्रंथाचे प्रकाशनही होणार आहे. सायंकाळी ४ वाजेनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यासाठी राज्यासह राज्याबाहेरील विविध शिवाचार्य, महंत आणि गुरुवर्यांचे सानिध्य लाभणार आहे. तसेच अनेक लोकप्रतिनिधी, माजी मंत्री, खासदार, आमदार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक, माजी उपसरपंच नागोराव पांडागळे , माजी सभापती तथा भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे यांनी केले आहे.

चालक कोसळला, विनाचालक बाईक सुसाट धावली

# दोन वाहनांना धडक, पाच जण गंभीर

प्रतिनिधी । **हदगाव**

गणेश विसर्जन मिरवणुकीची गर्दी पांगत असतानाच हदगाव शहरात अत्यंत विचित्र आणि थरारक अपघात घडला. दुचाकी चालवत असताना चालकाचा ताबा सुटून तो रस्त्यावर कोसळला. मात्र, दुचाकी थांबण्याऐवजी विनाचालक सुसाट वेगाने पुढे गेली आणि रस्त्यावर असलेल्या नागरिकांना तसेच दोन वाहनांना धडकली. या अपघातात दुचाकीचालकासह पाच जण गंभीर जखमी झाले. त्यात पाच वर्षांच्या चिमुकलीचाही समावेश आहे. हा अपघात २५ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडला.

गणेश विसर्जन मिरवणुकीनिमित्त हदगाव शहरात विविध गणेश मंडळांच्या देखण्या मूर्ती पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो नागरिक दाखल झाले होते. मिरवणूक पाहून केदारगुडा येथील रहिवासी केशव सूर्यवंशी (वय ५५, व्यवसाय टेलर) हे आपल्या हिरो स्प्लेंडर (एमएच २६ सीझेड ६१५१) या दुचाकीवरून गावाकडे परतत होते. रात्री आठच्या सुमारास शहरातील रस्त्यावर अचानक त्यांच्या दुचाकीवरील ताबा सुटला. त्यामुळे तोल जाऊन केशव सूर्यवंशी दुचाकीसह खाली पडले.मात्र, त्यानंतर घडलेले दृश्य पाहून उपस्थितांच्या अंगावर काटा आला. चालक रस्त्यावर कोसळला असतानाही दुचाकी पुढे धावतच राहिली. दुचाकीचा वेग अधिक असल्याने किंवा एक्सलेटर अडकल्याने ती थांबली नसल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. विनाचालक सुसाट धावणाऱ्या दुचाकीने पुढे चालत असलेल्या नागरिकांना धडक दिली. त्यानंतर रस्त्यावरील आणखी दोन वाहनांनाही धडक बसल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.

धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीच्या धडकेत पाच जण गंभीर जखमी झाले. रक्तबंबाळ अवस्थेत नागरिक रस्त्यावर पडल्याचे पाहून उपस्थितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अपघाताचा आवाज आणि जखमींचा आक्रोश ऐकून नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना तातडीने हदगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.जखमींमध्ये दुचाकीचालक केशव सूर्यवंशी (वय ५५, रा. केदारगुडा), तुकाराम तुळशीराम कांबळे (वय ४०, रा. डोरली), राजू दत्ता शिरसाट (वय ४०, रा. डोरली), गाडेकर (वय ४२, रा. डोरली) आणि डोरली येथील पाच वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आहे.

नांदेडकरांचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रतिसाद; १५ टनांपेक्षा जास्त निर्माल्य संकलित

# ४० हजारहून अधिक गणेश मूर्तींचे केले विसर्जन

प्रतिनिधी । **नांदेड**



### विसर्जन व्यवस्थेच्या ठळक बाबी

○ पालिकेच्या ६ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण १७ मूर्ती संकलन केंद्रामध्ये मध्ये मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. ○ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सर्व कृत्रिम हौद व मूर्ती संकलनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी १४ निर्माल्य कलश/कंटेनरची व्यवस्था करण्यात आल्याने एकूण १५.१७६ मेट्रिक टन इतके निर्माल्य संकलन झाले. ○ सर्व मूर्ती संकलन केंद्रावरील गणेश मूर्ती एकत्रित करून वाहतूक करण्यासाठी एकूण ३५ आयचर वाहने नियुक्त करण्यात आली होती ○ मोठ्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी एकूण २५ मोठ्या क्रेन स्थापित करण्यात आल्या होत्या. ○ प्रत्येक विसर्जन घाटावर आवश्यक ती विद्युत रोषणाई व जीव रक्षकांची टीम तैनात करण्यात आली होती.

यंदाच्या गणेशोत्सवात नांदेडकरांनी परंपरेचे भान जपत आणि पर्यावरणाविषयीची आपली सामाजिक जबाबदारी ओळखून नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला.. सार्वजनिक व घरगुती गणेश विसर्जनादरम्यान शहरात एकूण ४० हजार ८९७ गणेश मूर्तीचे पर्यावरणपूरकरित्या विसर्जन करण्यात आले असून, विसर्जन स्थळांवरून एकूण १५.१७६ मेट्रिक टन निर्माल्य जमा करण्यात आले आहे, अशी माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे.

महापालिकेच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव पूर्णपणे पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. नदीपात्र, तलाव आणि इतर नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या सोशल मीडिया माध्यमांद्वारे, तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये होर्डिंग्ज, बॅनर्स आणि पोस्टर्स लावून व्यापक जनजागृती करण्यात आली होती. नागरिकांनी आपले निर्माल्य गोदावरी नदीपात्रात किंवा इतर तलावांमध्ये टाकू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे सातत्याने केले जात होते.

नांदेडकरांची गैरसोय होऊ नये आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे रक्षण व्हावे, या उद्देशाने महापालिकेमार्फत शहरात ठिकठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली होती. तसेच विविध प्रभागांमध्ये घरगुती गणेश मूर्तीसाठी मूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली होती. या पर्यायी व्यवस्थेचे नागरिकांनी मनापासून स्वागत केले. मोठ्या संख्येने भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन या कृत्रिम तलावांमध्ये केले, तर अनेकांनी संकलन केंद्रांवर मूर्ती सुपूर्द करून पर्यावरण रक्षणात आपला खारीचा वाटा उचलला. विसर्जनाच्या दिवशी महापालिकेच्या स्वच्छता पथकांनी अत्यंत तत्परतेने काम करत विसर्जन स्थळांवरून तब्बल १५.१७६ मेट्रिक टन निर्माल्य गोळा केले. यामुळे नदीपात्र कचरामुक्त राहण्यास मोठी मदत झाली आहे. त्याचबरोबर पालिकेच्या यंत्रणे मार्फत शहरासोबतच ग्रामीण भागातील सुद्धा गणेश मूर्तिंचे मोठ्या प्रमाणावर विसर्जन करण्यात आले आहे.

गोदावरी व आसना नदीतील पाणी प्रदुषीत होऊ नये व जलसंपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून पर्यावरणपुरक कृत्रिम तलावात लहान व मध्यम आकाराचे मूर्तीचे आणि खदान व कृत्रिम तलावात मोठ्या गणेश मूर्तीचे विसर्जन करुन पर्यावरणपुरक गणेशोत्सव पार पाडण्यात आला असुन सदरील विसर्जन व्यवस्था महापालिका आयुक्त आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशान्वये व अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखालील उपआयुक्त अभिजित वायकोस,नितीन गाढवे, अजितपालसिंघ संधु, गंगाधर ईरलोड यांच्या नियंत्रणात पालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेऊन श्री गणेश विसर्जन शांततेत पार पाडले आहे.

# खून प्रकरणातील तिघांना काही तासांत केली अटक

प्रतिनिधी । **नांदेड**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने जुनी कौटुंबिक वैमनस्याची व अनैतिक संशय मनात धरून एका ३५ वर्षीय तरुणावर धारदार खंजीरने वार करून त्याचा खून करणाऱ्या तिघा आरोपींना तातडीने ताब्यात घेतले आहे.

दि. २५ सप्टेंबर रोजी मयत नरेश बालाजी पवार (वय ३५ वर्षे, रा. भाग्यश्री सोसायटी, वसरणी, नांदेड) हा रात्री कौठा भागातील मित्रांना भेटण्यासाठी गेला होता. रात्री ९.४५ च्या सुमारास बसवेश्वरनगर भागातील चक्कीजवळ आरोपींनी मयत नरेशला गाठले. जुन्या घटनेचा राग मनात बाळगून आरोपी राधेशाम उर्फ लिंब्या, त्याचा चुलत भाऊ गजानन गोंदवड यांनी नरेशच्या छातीवर, बरगडीत व हातावर धारदार खंजरे वार करून फरार झाले होते.

गंभीर अवस्थेत नरेशचे मित्र व नातेवाईकांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी नांदेड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले व घटनास्थळाची पाहणी करून तातडीने तपासाची चक्रे फिरवण्यात आली. घटनेनंतर तिन्ही आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते. तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण व स्थानिक गुप्त खबऱ्यांमार्फत आरोपींच्या हालचालींची माहिती मिळवली. त्याच्या आधारे आरोपी राधेशाम उर्फ लिंब्या प्रल्हाद गोंदवड, गजानन घनश्याम गोंदवड, रामेश्वर रमेश गोंदवड (सर्व रा. बसवेश्वरनगर कौठा नांदेड) या अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले. या प्रकरणाचा तपास पोउपनि रवींद्र तारु हे करत आहेत.

पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि व्यंकट कुसमे, पोउपनि. बाबुराव चव्हाण व त्यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार राजू जकुटे, विलास भिसे, गुरुनाथ कारामुंगे, शेख जमीर, जाधव, हनवंता कदम, शेख गफार, भगवान टिपरसे, संतोष पवार, कल्याणकर, कांबळे, शेख आसिफ, माळगे तसेच राज सिटीकर व दिपक ओढणे यांनी ही कारवाई पूर्ण केली.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार : आ. बोंढारकर

प्रतिनिधी । **नांदेड**



दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असून, त्यांच्या समस्या शासनाच्या योग्य पातळीवर मांडून आवश्यक मदत व दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही आमदार आनंदराव बोंढारकर यांनी दिली.

आ. बोंढारकर यांनी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भायेगाव, राहेगाव, किकी, काकांडी, तुप्पा, हेमला तांडा, बाभुळगाव तसेच पुणेगाव, नागापूर, इंजेगाव, वडगाव, पिंपळगाव मिश्री आणि वांगी येथील शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची पाहणी केली. यावेळी पावसाचे प्रमाण, जमिनीतील ओलावा, पिकांची वाढ आणि पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम याचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, उत्पादनावर होणारा परिणाम, पाण्याची उपलब्धता तसेच शेतीसमोरील विविध अडचणी जाणून घेण्यात आल्या. प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांना कोणत्या स्वरूपाच्या मदतीची आवश्यकता आहे, याबाबतही माहिती घेण्यात आली.शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची परिस्थिती समजून घेणे आणि त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना आवश्यक मदत व दिलासा मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू, असे आ. बोंढारकर यांनी सांगितले.यावेळी प्रभारी तहसीलदार स्वप्निल दिगलवार, तालुका कृषी अधिकारी संजय चातूरमाल, कृषी अधिकारी सुनील सानप, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, बालाजी पाटील भायेगावकर, सुदिन पाटील बागल, शिवाजी कदम, उत्तम यांच्यासह सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश

प्रतिनिधी । **नांदेड**

### १२ उपाययोजना व सवलती लागू

दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट यांचा समावेश आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पंपांना सदर सवलत लागू राहणार आहे.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, या परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक तसेच पशुधनाला दिलासा देणाऱ्या १२ उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश असून, या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार व कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकताच नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच पालकमंत्री अतुल सावे यांनीही जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

१४ तालुक्यांत 'ट्रिगर-१'नुसार पंचनामे

जून महिन्यापासून आतापर्यंतच्या कालावधीतील पर्जन्यमानातील तूट व अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर आणि नायगाव या १४ तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील 'ट्रिगर-१ (प्रथम कळ)' अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत.

सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची सद्य:स्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच जीपीएस निर्देशांक संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

तसेच शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांचा वीजपुरवठा खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांसाठी पुरेसा अन्नधान्य पुरवठा करणे, टंचाई निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक व्यवस्था करणे, पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच शासनाच्या यापूर्वीच्या निर्णयांनुसार पिण्याचे पाणी व पशुधनासाठी पाण्याचे नियोजन करणे, अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

**नियमभंग** नांदेडकरांनो, जीव महत्त्वाचा की मोबाईल ?

# दुचाकी चालवताना वापर; पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष

प्रतिनिधी । **नांदेड**

### कठोर पावले उचलण्याची गरज



वाहतुकीला शिस्त लावायची असेल तर केवळ कागदी कायदे करून चालणार नाही, तर त्याची अंमलबजावणी जमिनीवर होणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून मोबाईलवर बोलणाऱ्या दुचाकीस्वारांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नांदेडकरांमधून केली जात आहे. जर आताच या प्रवृत्तीला आळा घातला नाही, तर शहरातील रस्ते आणखी मृत्यूचे सापळे बनण्यास वेळ लागणार नाही.

शहरातील रस्ते वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिकेकडून विविध स्तरांवर उपाययोजना केल्या जात असल्याचा दावा वारंवार केला जातो. मात्र, शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांमध्ये फिरताना वास्तव काही वेगळेच असल्याचे दिसून येते. काही वाहनचालकांनी तर जणू 'हम नही सुधरेंगे' असा ठाम निर्धारच केल्याचे चित्र आहे. सध्या शहरात दुचाकी चालवताना सर्रासपणे मोबाईलचा वापर केला जात असून, वाहतूक नियमांची उघडपणे पायमल्ली होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, डोळ्यांदेखत होणाऱ्या या जीवघेण्या प्रकाराकडे वाहतूक पोलिसांचे साफ दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शहरातील व्हीआयपी रोड, आयटीआय कॉर्नर, शिवाजी नगर, वजिराबाद, आणि सिडको यांसारख्या अत्यंत गजबजलेल्या भागात दुचाकीस्वारांकडून मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. एक हाताने दुचाकीचे हँडल धरून दुसऱ्या हाताने फोनवर बोलणे किंवा कान आणि खांद्यामध्ये मोबाईल अडकवून मान वाकवून संवाद साधत गाडी चालवणे, असे जीवघेणे स्टंट शहरात सर्रास पाहायला मिळत आहेत. काही तरुण तर चालू गाडीवर मेसेज टाईप करणे किंवा सोशल मीडिया स्क्रोल करण्यात मग्न असतात. यामुळे स्वतःचा तर जीव धोक्यात येतोच, पण पादचारी आणि इतर प्रामाणिक वाहनचालकांच्या जीवालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक पोलीस तैनात असतात. मात्र, त्यांचे लक्ष केवळ विनाहेल्मेट चालक किंवा कागदपत्रे तपासण्यावरच अधिक असते की काय, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. मोबाईलवर बोलत डोळ्यांसमोरून निघून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना हटकण्याचे किंवा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे धाडस पोलीस दाखवत नसल्याचे चित्र आहे. पोलिसांच्या या 'ढिसाळ' कारभारामुळे अशा बेशिस्त वाहनचालकांचे मनोबल अधिकच वाढत आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे लावणे भोवले

# २५ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । **नांदेड**

जिल्ह्यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश झुगारून विनापरवाना मिरवणूक काढणाऱ्या व डीजे सिस्टीम वाजवणाऱ्या पाच गणेश मंडळांच्या एकूण २५ पदाधिकाऱ्यांवर माहूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच मिरवणुकीत वापरण्यात आलेली चार आयशर वाहने व डीजे सिस्टीम असा एकूण एक कोटी ३७ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

शुक्रवारी (दि.२४) सायंकाळच्या सुमारास मौ. लखमापूर तांडा येथे श्री गणेश विसर्जन बंदोबस्तासाठी माहूर येथील पोलीस अंमलदार हजर असताना, लखमापूर तांडा येथील मिरवणुकीत दोन परवानाधारक व तीन विनापरवाना अशी एकूण पाच गणेश मंडळे सहभागी झाल्याचे निदर्शनास आले. पोलीस अधिकाऱ्यांच्या लेखी व तोंडी सूचनांकडे दुर्लक्ष करून कर्कश आवाज करत डीजे सिस्टीम वाजवली आणि मिरवणूक विनाकारण रेंगाळत ठेवून लोकांच्या जीवितास व आरोग्यास धोका निर्माण होईल असा मोठा कर्कश आवाज करून शांतता भंग केली.

पोलिसांनी मिरवणूक संपल्यानंतर एमएच-१२, एमव्ही-२६३१, एमएच-०४, एचडी-४८४१, एमएच-०४, ईवाय-५१४७ आणि एमएत-१४, एलएक्स-२५७२ ही वाहने डीजेसह जप्त केली आहे. या प्रकरणी एकूण २५ आरोपींविरुद्ध माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी, मांडवी यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर जिल्हा प्रशासनाने सुरवातीलाच डिजेच्या वापराबाबत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले होते.परंतू लखमापूर तांडा येथील पाच गणेश मंडळाने हा आदेश जुगारून विसर्जन मिरवणूकीत डिजेचा वापर केल्यामुळे आता त्या गणेश मंडळावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.